www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी

तरुणांचा बुलंद आवाज

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 220 वा शुक्रवार दि. २५ एप्रिल २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

## या वीकेंडला मिळणार पनवेल स्मार्ट मम्मीज यांच्या धमाकेदार इव्हेंट ची मेजवानी

### पनवेल नाईट मार्केट 3.0 चे रंगारंग आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल /प्रतिनिधी.**

पनवेल मधील सुप्रसिद्ध "पनवेल स्मार्ट मम्मीज" या संस्थेच्या वतीने पनवेल नाईट मार्केट या इव्हेंटचे आयोजन करण्यात आले आहे. या इव्हेंट्स चे यंदाचे तिसरे वर्ष आहे. महिलांमधील सुप्त गुणांना वाव देण्याच्या पनवेल स्मार्ट मम्मीज यांच्या उद्देश पूर्तीच्या अनुषंगाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २६ आणि २७ एप्रिल रोजी सायंकाळी चार ते दहा दरम्यान पनवेल नाईट मार्केट इव्हेंट साजरा होणार असून यासाठी प्रवेश विनामूल्य असणार आहे. महिलांनी केवळ चूल आणि मुल एवढ्यापुरतच मर्यादित न राहता स्वतःमधील अंगभूत गुणांसाठी आणि स्वतःच्या व्यक्तिमत्व विकासासाठी सुद्धा वेळ दिला पाहिजे. याच प्रामाणिक भूमिकेतून संस्थापिका शितल ठक्कर यांच्या नेतृत्वाखाली १६ वर्षांपूर्वी पनवेल स्मार्ट मम्मी या ग्रुपची स्थापना करण्यात आली. आतापर्यंत या संस्थेच्या वतीने महिलांकरता अनेक लोकाभिमुख कार्यक्रम राबविले गेले आहेत. विविध फॅशन शो, क्रीडा स्पर्धा, हळदी कुंकू, कार्यशाळा, पिकनिक,भोंडला अशा अनोख्या कार्यक्रमांच्या माध्यमातून संसारात गुरफटलेल्या मम्मीज ना एक खुला रंगमंच उपलब्ध करून देण्याचे काम ही संस्था प्रामाणिकपणे करत आहे. संस्थेच्या याच उद्दिष्ट पूर्तीच्या अनुषंगाने पनवेल नाईट मार्केट ही संकल्पना राबविण्यात आली. यामध्ये होतकरू महिलांनी उभारलेले विविध स्टॉल असणार आहेत. विविध लाईव्ह फूड कॉर्नर्स असणार आहेत. तसेच धमाकेदार डीजे नाईट, लहान मुलांसाठी फॅशन शो आणि मिस्टर अँड मिसेस पनवेल ग्लोबल टायटल असणारा फॅशन शो हे या इव्हेंटचे प्रमुख आकर्षण असतील. राजकीय आणि व्यावसायिक क्षेत्रातील अनेक दिग्गज मंडळींची या इव्हेंटला प्रमुख उपस्थिती असणार आहे. पनवेल मधील विठोबा खंडाप्पा हायस्कूलच्या भव्य प्रांगणावर पनवेल नाईट मार्केट चे आयोजन करण्यात आले आहे. रंगारंग कार्यक्रमाने खच्चून भरलेल्या या इव्हेंटमध्ये प्रवेश विनामूल्य असणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन शीतल ठक्कर तसेच पनवेल स्मार्ट मम्मीज यांच्या वतीने करण्यात आले आहे.

PSM
PANVEL SMART MOMMIES

## पनवेल विहीघर येथील ग्रामस्थांच्या विरोधामुळे नैनाचे पथक फिरले माघारी

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर



विहिघर एका बांधकामावर कारवाई करण्यासाठी नैनाचे पथक गुरुवारी आले होते. यावेळी ग्रामस्थांनी केलेल्या विरोधामुळे नैनाच्या पथकाला माघारी फिरावे लागले. ग्रामस्थांच्या एकजुटीचा हा विजय आहे. तेवीस गावांमध्ये होत असलेल्या नैनाला ग्रामस्थांचा कडाडून विरोध कायम आहे. शेतकऱ्यांना 60 -40 चा फॉर्म्युला मान्य नाही. या विरोधात शेतकऱ्यांनी अनेक मोर्चे, आंदोलने, निषेध, मूक मोर्चा काढलेले आहेत. नैना मुळे येथील शेतकरी उध्वस्त होणार असल्याचे बोलले जात आहे. नैना प्रश्न विधिमंडळात देखील उपस्थित झाला आहे. मात्र तरीदेखील नैनाने गावांमध्ये कारवाई सुरू ठेवलेली आहे. या विरोधात एकूण आठ ते नऊ याचिका दाखल करण्यात आले आहेत. ग्रुप ग्रामपंचायत चिपळे हद्दीतील पाच गावांनी देखील नैना विरोधात याचिका दाखल केली आहे. गुरुवार 24 एप्रिल रोजी नैनाचे पथक पोलीस बंदोबस्तासह येथील एका बांधकामावर तोडक कारवाई करण्यासाठी आले होते. याची माहिती ग्रामस्थांना मिळताच ग्रामस्थांनी एकजुट दाखवत या कारवाईला जाहीर विरोध केला. यावेळी नैना विरोधात याचिका दाखल करण्यात आली असल्याचे त्यांना सांगण्यात आले. ग्रामस्थांनी दाखवलेल्या एकजुटीपुढे नैनाला माघार घ्यावी लागली. यापुढे देखील गावांमध्ये नैना अशा प्रकारे कारवाई करण्यासाठी येत असेल तर ग्रामस्थांनी एकजूट दाखवावी आणि नैनाला हद्दपार करावे असे आवाहन करण्यात आले.

## सतरा वर्षीय तरुणीचे अपहरण

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

गणेशनगर, वलप येथुन 17 वर्षीय तरुणीचे अपहरण केल्याप्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या तरुणीचा चेहरा गोल, केस काळे असून वर्ण सावळा आहे. तिने अंगात निळ्या रंगाची जीन्स पॅन्ट आणि लाल रंगाचा टॉप परिधान केला आहे. तिला मराठी आणि हिंदी भाषा बोलता येते.

=============

## गावठी दारू प्रकरणी कारवाई

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पोयंजे येथे गावठी दारू प्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पोयंजे येथे गावठी दारू विक्री होत असल्याची माहिती पनवेल तालुका पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी रोहिदास हिरु चोरघे याच्या ताब्यात आठ लिटर गावठी दारू सापडून आली. पोलिसांनी ती जप्त केली.

## रेवदंडा परिसरात माकडांचा उपद्रव टोकाला; फळबागा, वाहतूक आणि घरे होत आहेत लक्ष्य

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**



रेवदंडा, चौल,रायगड जिल्ह्यात नागरिक भयभीत एकाच वेळी ५०–८० माकडांचा समूह नुकसान करत असल्याने स्थानिक त्रस्त झाले आहेत

रायगड जिल्ह्यातील रेवदंडा आणि परिसरातील गावांमध्ये माकडांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून, नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. हे माकडांचे थवे केवळ शेतीचं, वाड्यांच् नुकसान करत नाहीत, तर वाहतुकीलाही धोका निर्माण करत आहेत.वाहतूक धोक्यात, अपघातात हात फ्रॅक्चर मोटारसायकलस्वार शब्बाक तांडेल यांचा काही दिवसांपूर्वी माकडाच्या अचानक रस्त्यावर धावून आल्यामुळे अपघात झाला.

"मी सकाळी नेहमीसारखं कामावर जात होतो. अचानक माकड रस्त्यात आलं, मी गाडी वळवण्याचा प्रयत्न केला पण तोल गेला. पडून माझा हात फ्रॅक्चर झाला. एक महिना काही काम करू शकलो नाही," असं त्यांनी सांगितलं. अशा प्रकारच्या अपघातांची संख्या रेवदंडा भागात वाढते आहे.फळबागा, घरे झपाट्याने होतात नुकसान माकडांचे थवे आंबा, कोकम, चिकूच्या बागांमध्ये धुडगूस घालतात. घरात घुसून कौल , सिमेंटचे पत्रे फोडतात, अन्न शोधतात, आणि अनेकदा मालमत्तेचे नुकसान करतात.स्थानिक शेतकरी , वाडीवाले निलेश खोत सांगतात, “एकदा माकडांचा थवा आला की संपूर्ण झाडं साफ करतात. सगळं पीक वाया जातं.”

मेघा मढवी म्हणतात, “लहान मुलांना दाराबाहेर ठेवणं धोकादायक झालं आहे. भीतीचं वातावरण आहे. ”सरकारी हालचाली सुरू या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्य सरकारने माकडांच्या निर्बीजीकरणासाठी कोकणात एक विशेष केंद्र स्थापन करण्याचा विचार सुरू केला आहे.राज्याचे वनमंत्री गणेश नाईक म्हणाले, “नुसती नुकसानभरपाई देऊन काही उपयोग नाही. दीर्घकालीन प्रतिबंधात्मक उपाय करावेत लागतील, आणि त्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही.”

## विविध नागरी समस्यांचे निराकरण करण्याची युवा सेनेने केली आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**



पनवेल महानगर पालिका क्षेत्रातील महत्वाच्या विषयासंदर्भात आज युवासेना जिल्हा अधिकारी पराग शरद मोहिते यांनी युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांसह महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांची भेट घेतली. व विविध विषयांसंदर्भात चर्चा करून मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी युवा सेना जिल्हाधिकारी पराग मोहिते यांच्यासह तालुका अधिकारी मनोज कुंभारकर, महानगर अधिकारी महेश भिसे, महानगर चिटणीस जीवन पाटील, तालुका चिटणीस अजय पाटील, पनवेल शहर अधिकारी निखिल भगत, नविन पनवेल शहर अधिकारी जितेंद्र सिद्धू, शहर चिटणीस सृजन जोशी आदी पदाधिकारी तथा युवासैनिक उपस्थित होते. यावेळी आयुक्त मंगेश चितळे यांच्याशी चर्चा करताना पराग मोहिते यांनी सांगितले की, मध्यंतरी युवासेनेच्या माध्यमातून पानपट्टी हटवण्याची मोहीम हाती घेतली होती. या दरम्यान महापालिकेने जवळपास सर्वच अवैध्य पानपट्ट्या हटवल्या होत्या. मात्र काही काळाने पुन्हा त्या पानपट्ट्या सदर ठिकाणी स्थापित झाल्याचे आयुक्तांच्या निदर्शनास आणून सदर पानपट्ट्या या कायमस्वरूपी हटवून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी युवासेनेने केली. आयुक्तांची त्वरित दखल घेत प्रशासनाला सदर कारवाईच्या सूचना केल्या. तसेच पनवेल परिसरातील सर्व खाजगी, शासकीय आणि निमशासकीय शाळांचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे तसेच अपूर्ण असलेली कामे नवीन शालेय कार्यकाळ सुरू होण्यापूर्वी करून घेण्याचे आदेश शाळांना देण्यासंदर्भात महापालिका आयुक्तांकडे मागणी केली. आयुक्तांनी सदर विषयाची दखल घेत युवासेना शिष्ठमंडळासमोरच अधिकाऱ्यांना तातडीने शाळा आणि कॉलेजना या संदर्भात आदेश काढण्याच्या सूचना केल्या. तसेच याचा वैयक्तिक पाठपुरवठा करणार असल्याचेही आश्वासित केले. त्याचप्रमाणे देवीचा पाडा येथील एमआयडीसी आणि महापालिका दरम्यान बांधण्यात आलेल्या रस्त्यामुळे रस्ता आणि ड्रेनेज लाईन यातली तफावत पुढील संभाव्य पाणी तुंबण्यात प्रवर्तित होऊ शकते हे आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिले. यावर आयुक्तांनी शहर अभियंत्यांना तातडीने निरीक्षण पथक नेमून उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या. तसेच त्याचा अहवालही पाठवण्यास सांगितले.



दैनिक युवक आधार - जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांच्या भ्याड हल्ल्यात नवीन पनवेल येथील रहिवासी दिलीप देसले मृत्युमुखी पडले. त्यांच्या शोकाकुल कुटुंबाची खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट घेत सांत्वन केले. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, समीर ठाकूर, जगदीश घरत, सुधाकर थवई, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे आदी उपस्थित होते.

## पहलगाम हल्ल्याचा पनवेल शिवसेनेतर्फे निषेध

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**




जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे धर्म विचारून निर्दोष नागरिकांची गोळ्या घालून हत्या केल्याच्या घटनेचा शिवसेना पनवेल यांच्या वतीने जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे साहेब यांच्या नेतृत्वाखाली ता.23 रोजी संध्याकाळी कामोठे शहरात निषेध करण्यात आला व हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या भ्याड हल्ल्यात जखमी झालेल्या भारताच्या कानाकोपऱ्यातील सर्व नागरिकांचे आरोग्य लवकरात लवकर सुधारावे यासाठी प्रार्थना करण्यात आली. पाकिस्तान मुर्दाबाद, आतंकवाद मुर्दाबाद, आतंकवादीयों सावधान जाग उठा है नौजवान या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. पाकिस्तान ध्वज जाळून घोषणाबाजी करत या दहशतवादी कृत्याबद्दल आपला रोष व्यक्त केला. शिवसेना या अमानुष कृत्याचा तीव्र निषेध करते. या घटनेमुळे देशातील नागरिकांमध्ये भीती आणि संतापाची भावना निर्माण झाली आहे. केवळ धर्म विचारून निष्पाप लोकांचे प्राण घेणे हे दहशतवादाचे आणि कट्टरवादाचे अत्यंत निंदनीय स्वरूप आहे. शिवसेनेच्यावतीने हिंसाचाराचा आणि द्वेषपूर्ण कृत्यांचा कठोर शब्दांत निषेध करण्यात आला. या हत्याकांडातील दोषींचा त्वरित अटक खातमा करावा व काश्मीरमधील निर्दोष नागरिकांच्या सुरक्षेची आणि संरक्षणाची व्यवस्था अधिक मजबूत करावी, केंद्र सरकारने या घटनेचा गांभीयनि दखल घेऊन प्रभावी उपाययोजना करावी जेणेकरून भविष्यात अशा घटनांना पायबंद घालता येईल व समाजात द्वेष आणि भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या कट्टरपंथी विचारांचा समूळ नायनाट करण्यासाठी कठोर पाऊले उचलण्यात यावीत अशी मागणी रामदास शेवाळे यांनी यावेळी निषेध व्यक्त करताना केली. शिवसेना देशाच्या एकता आणि अखंडतेसाठी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी लढत आलेली आहे. शिवसेनेच्यावतीने या प्रसंगी मृत्त झालेल्या नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या निषेध व श्रद्धांजली सभेला शिवसेना जिल्हाप्रमुख पनवेल रामदास शेवाळे साहेब, कामोठे शहर प्रमुख सुनील भाऊ गोवारी, कळंबोली शहर प्रमुख तुकाराम शेठ सरक, खारघर शहर प्रमुख प्रसाद परब, व इतर पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## महाराष्ट्रातील पहिली मुस्लिम महिला IAS – यवतमाळच्या अदिबा अनमचे UPSC 2024 मध्ये थेट यश!

दैनिक युवक आधार
यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:
-जितेंद्र खोडे
यवतमाळ,दि.23 एप्रिल:



केंद्रीय लोकसेवा आयोगाचा (**UPSC** 2024) अंतिम निकाल जाहीर झाला असून यामध्ये यवतमाळच्या अदिबा अनम अशफाक अहमद हिने संपूर्ण देशात १४२ वा क्रमांक पटकावला आहे. वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षी हे यश मिळवत तिने महाराष्ट्राची आणि यवतमाळ जिल्ह्याची मान उंचावली आहे. अदिबा अनम ही महाराष्ट्रातील पहिली मुस्लिम महिला **IAS** अधिकारी बनण्याच्या मार्गावर आहे. अदिबा यवतमाळ शहरातील कळंब चौकाजवळील कुरेशीपुरा येथे राहते. ती हज हाऊस **IAS** ट्रेनिंग इन्स्टिट्यूट आणि नंतर जामिया रेसिडेन्शियल ट्रेनिंग इन्स्टिट्यूटची विद्यार्थिनी होती.तिच्या या यशामुळे संपूर्ण जिल्ह्यातून आणि विशेषतः मुस्लिम समाजातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.या यशाच्या निमित्ताने कॉम्रेड सचिन मनवर मित्र परिवार,यवतमाळ (चळवळीला आयुष्य समर्पित करणाऱ्या सर्वच पँथरच्यावतीने) अदिबा हिच्या राहत्या घरी जाऊन तिचा सत्कार करून सदिच्छा व्यक्त केल्या. या प्रसंगी तिचे वडील अशफाक अहमद, मुस्लिम समाजातील विविध मान्यवर, केजीएन इलेक्ट्रॉनिक मीडियाचे जिल्हा प्रतिनिधी सय्यद मतीन,दैनिक यवतमाळ सुपरचे जिल्हा प्रतिनिधी नितीन भुसरेड्डी, कॉम्रेड सचिन मनवर आणि राहुल मेश्राम उपस्थित होते.अदिबाच्या या यशामुळे यवतमाळ जिल्हा शैक्षणिक आणि सामाजिक चळवळीच्या पटलावर नवा इतिहास घडवत आहे. तिच्या वाटचालीमुळे अनेक तरुण आणि विशेषतः अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना नवी दिशा मिळणार आहे.

## शोकाकुल वातावरणात दिलीप देसले यांच्यावर अंत्यसंस्कार, पनवेलकरांची मोठ्या संख्येने उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**



जम्मू काश्मीर येथील पहलगाम दहशतवादी हल्ल्यांमध्ये नवीन पनवेल येथील दिलीप देसले यांच्यावर शोकाकुल वातावरणामध्ये बुधवारी (ता. २३) अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मुलाने मुखाग्नी देत आपल्या वडिलांना शेवटचा निरोप दिला. या वेळी पनवेलकर मोठ्या संख्येने उपस्थित होते. पहलगाम हल्ल्यामध्ये मृत्युमुखी पडलेले दिलीप देसले हे लुब्रिकंट ऑइल कंपनीमध्ये निवृत्त झाले होते.

दिलीप देसले यांचे पार्थिव काश्मीरहून मुंबई विमानतळावर आणण्यात आले. तेथून पनवेल महापालिकेच्या रुग्णवाहिकेतून हे पार्थिव नवीन पनवेल सेक्टर १२, रोड क्रमांक १६ येथील प्लॉट नंबर १० या ठिकाणी सायंकाळी साडेपाच वाजता आणण्यात आले. देसले यांच्या घराबाहेर पोलिसांचा बंदोबस्त होता. कुटुंबीय, नातेवाईक त्याचबरोबर पनवेलकरांनी अंतिम दर्शन घेतल्यानंतर देसले यांच्या पार्थिवावर पोदी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी शिक्षणमंत्री दादा भुसे, आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाधिकारी किशन जावळे, माजी आमदार बाळाराम पाटील, पोलिस उपायुक्त प्रशांत मोहिते, वाहतूक विभागाचे पोलिस उपायुक्त तिरुपती काकडे, सहाय्यक पोलिस आयुक्त अशोक राजपूत, पनवेल महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, माजी नगराध्यक्ष सुनील घरत, संदीप पाटील यांच्यासह अनेक जणांनी दिलीप देसले यांना अखेरचा निरोप दिला. त्यांच्या कुटुंबीयांनी केलेला आक्रोश पाहून अनेकांना गहिवरून आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे.

द • ख • ल

## पनवेल तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे आरक्षण जाहीर, 35 ठिकाणी होणार महिला सरपंच

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींसाठी २०२५ ते २०३० या कार्यकाळासाठी सरपंच पदांचे आरक्षण मंगळवार २२ एप्रिल २०२५ रोजी जाहीर करण्यात आले. ही आरक्षण प्रक्रिया सोडत पद्धतीने पार पडली असून एकूण ७१ ग्रामपंचायतींमध्ये विविध प्रवर्गासाठी आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. या आरक्षण यादीमध्ये सर्वसामान्य, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच महिलांसाठीचे आरक्षण लक्षवेधी ठरले. विशेषतः महिलांसाठी मोठ्या प्रमाणावर सरपंच पदे आरक्षित करण्यात आली आहेत. जवळपास ३५ ग्रामपंचायतींमध्ये महिलांना आरक्षण मिळाले असून त्यामध्ये सर्वसामान्य महिला, अनुसूचित जाती व जमाती महिला आणि मागासवर्गीय प्रवर्गातील महिला यांचा समावेश आहे. 35 ग्रामपंचायतींमध्ये महिला सरपंच होणार आहेत.

चौकट

**महिला आरक्षण ग्रामपंचायती**

सावळे, माळडुंगे, खैरवाडी, शिरवली, कानपोली, वाजे, गव्हाण, दापोली, दुन्दरे, वाघिवली, तुराडे ,चावणे, आकुर्ली, वडघर, हरीग्राम, सांगुली, वांगणी तर्फे वाजे, उलवा, पाली देवद, भातान, तरघर, वावेघर, चिखले, पारगाव, पाले बुद्रुक, खेरणे, केवाळे, जांभिवली, पोयंजे, न्हावे, शिरढोण, वारदोली, पळसपे, विचुंबे, केळवणे

**२०११ ची जनगणना विचारता घेतली आहे : पवन चांडक प्रांताधिकारी पनवेल**

खेळी मेळीच्या वातावरणाता आज आरक्षण सोडत झाली आहे. गेल्या तीन निवडणुकीत पडलेले आरक्षण विचारात घेतले आहे. २०११ ची जनगणना विचारात घेतली आहे. त्या पद्धतीने सदस्य संख्या निश्चित केली आहे. अशी माहिती प्रांताधिकारी पवन चांडक यांनी दिली आहे.

**अनुसूचित जाती- नेरे, करंजाडे अनुसूचित जाती (महिला)- सावळे** अनुसूचित जमाती– नानोशी, आपटा, कर्नाळा, पोसरी, बारवई. अनुसूचित जमाती (महिला)– मालडुंगे, खैरवाडी, शिरवली, कानपोली, वाजे, गव्हाण

नागरिकांचा मागास प्रवर्ग –
ओवळे, कोन, वाकडी, खानावळे, शिवकर, चिंध्रण, आदई, भिंगार, मोर्बे

नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)–
दापोली, दुंदरे, वाघीवली, तुराडे, चावणे,आकुर्ली, वडघर, हरिग्राम, सांगूर्ली, वागणी तर्फे वाजे,

सर्वसाधारण– कुंडेवहाळ, चिपळे, वहाळ, गिरवले, गुळसुंदे, खानाव, साई,देवद,वलप, नांदगाव, कोळखे, कराडेखुर्द,कसळखंड, सोमटणे, उमरोली, दिघाटी, उसर्लीखुर्द, देवळोली, वांवजे, नितळस

**सर्वसाधारण (महिला)-** उलवा, पालीदेवद, भाताण, तरघर, वावेघर, चिखले, पारगाव, पालेबुद्रक, खेरणेखुर्द, केवाळे, जांभिवली, पोयजे, न्हावे, शिरढोण, वारदोली, पळस्पे, विचुंबे, केळवणे.

## पाकिस्तानचा माज उतरवण्याची हीच खरी वेळ, भारतीय सैन्य पाकिस्तानला नक्की धडा शिकवेल - माजीमंत्री आ. बबनराव लोणीकर

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी. नामदेव मंडपे**
**मंठा जालना**



पंतप्रधान नरेंद्र मोदीजी, गृहमंत्री अमित शहा आणि भारतीय सैन्यावर देशभक्त भारतीयांचा १००% विश्वास –आ. लोणीकर

भारताचा स्वर्ग म्हणून संबोधल्या जाणाऱ्या जम्मू-काश्मीर मधील पहलगाम या ठिकाणी पाकिस्तानच्या दहशतवादी संघटनांकडून काल भीषण दहशतवादी हल्ला करण्यात आला. उन्हाळी सुट्ट्यांचा आनंद लुटण्यासाठी आलेल्या पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून दहशतवाद्यांनी गोळ्या झाडल्या. अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. जम्मू-काश्मीरमधील अलीकडच्या काळात झालेला हा सर्वात भीषण दहशतवादी हल्ला आहे. २६ पर्यटकांचा या दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झाला आहे. पहलगाम हे काश्मीरमधील पर्यटन स्थळ आहे. इथे नेहमीच पर्यटकांची गर्दी असते. काल दुपारी इथे मोठ्या संख्येने पर्यटक असताना हा दहशतवादी हल्ला झाला. पहलगामच्या सौंदर्याला काल रक्तरंजित करण्यात आलं. देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी गृहमंत्री श्री अमित भाई शहा यांनी याबाबत कठोर भूमिका घेऊन पाकिस्तानला नेस्तनाबूत करण्यासाठी ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. भारत सरकारच्या वतीने भारतीय सैन्याला आपले निर्णय स्वतः घेण्याची पूर्ण मुभा दिलेली आहेच परंतु याहीपेक्षा कठोरातील कठोर भूमिका घेऊन अतिरेक्यांना आणि अतिरेक्यांना आणि पाकिस्तानला अद्दल घडवण्याची हीच वेळ आहे. भारत सर्व दृष्टिकोनातून सक्षम असून या अतिरेकी हल्ल्याचा भारताकडून नक्कीच सर्जिकल स्ट्राइक सारखे उत्तर मिळेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाचे गृहमंत्री अमित शहा आणि भारतीय सैन्यावर देशभक्त भारतीयांचा १००% विश्वास आहे. – आ. बबनराव लोणीकर

# कोप्रोली गावचे जेष्ठ नाट्यकर्मी भालचंद्र म्हात्रे यांचा ८५ सावा वाढदिवस कौटुंबिक वातावरणात साजरा.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील कोप्रोली गावचे जेष्ठ रंगकर्मी भालचंद्र भास्कर म्हात्रे (भाऊ) हे सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्ती पण असामान्य असे व्यक्तीमत्व वयाची ८५ वर्ष पूर्ण करुन ८६ वर्षात पदार्पण केले आहे. परंतु एखाद्या तरुणाला लाजवेल असे त्यांचे कर्तुत्व आहे. त्यांचा वाढदिवस दिनांक २३ एप्रिल रोजी छोटेखानी आणि कौटुंबिक वातावरणात,द्रोणागिरी येथे त्यांची कन्या रंजना पाटील यांच्या निवासस्थानी साधेपणाने साजरा झाला. कोप्रोली सारख्या खेडेगावात जन्म, घरची शेती, जोडीला शिवणकाम येत असल्याने शिवणकामाचा व्यवसाय मुंबई मधील गिरगाव येथे वास्तव्यास असणारे, स्वातंत्र्य पुर्वीचा त्यांचा जन्म , उत्कृष्ट नाट्यकर्मी रंग देवतेचे पुजारी,अंगी असलेल्या कलेने त्यांना स्वस्थ बसू दिले नाही. त्याचप्रमाणे त्यांच्या नाट्यकलाकृतीतून उत्तम समाजप्रबोधनाचे कार्य होत होते. नाट्य म्हणजे संवादाद्वारे सादर केलेली कथा.




संवाद आणि अभिनयाद्वारे सादरीकरण होय. नाटकाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे प्रेक्षकांना कथा आणि पात्रांच्या भावनेशी जोडणे आणि हेच जोडण्याची कला असलेले भालचंद्र म्हात्रे यांनी दिग्दर्शित केलेले पहिले नाटक ' राक्षसी लालसा' कोप्रोली येथे सन १९६२ मध्ये शिवजयंती निमित्ताने सादर केले. या नाटकात शशांक नावाची खलनायकी भुमिका साकारली. १९६३ साली स्वता दिग्ददर्शित केलेले 'वाहिनीची माया' या नाटकातही खलनायकी भुमिका, त्यानंतर १९६४ मध्ये ऐतिहासिक नाट्य 'जय महाराष्ट्र' मध्ये बजाजी निंबाळकर यांची भूमिका, १९६५ मध्ये स्वदिग्ददर्शित ' खुनाला वाचा फुटली" यामध्ये हि पाटलाची खलनायकी भुमिका साकारली. १९६६ मध्ये रंगभूमीवरील गाजलेले नाटक 'पुण्यप्रभाव' यामध्ये वृदांवन या पात्राची खलनायकी भुमिका रंगभूमीवरील गाजलेले कलाकार मास्टर नरेश यांच्या स्त्री पात्रासोबत गाजवली. यानंतर १९६७ साली 'जन्मदाता सर्जेराव' हे खलनायकी भुमिकेतील शेवटचे नाटक. नाटकातील खलनायक म्हणजे नायकासाठी अडथळा आणणारे पात्र. अशा खलनायकी भुमिका त्यांनी गाजविल्या आहेत. आपल्या नाट्य प्रवासातील अशी अनेक नाटके गिरगाव येथे बसवून तेथील कलाकारांना घेऊन सराव करून कोप्रोली येथे सादरीकरण होत असे.आपल्या गावातील प्रेक्षकांसाठी गावात नाट्यप्रयोग सादर केले आहेत. गिरगाव येथे शास्त्रोक्त तबला शिकून मग किर्तन, तसेच नाटकातही तबल्याची साथ दिली आहे. याशिवाय गायन, हार्मोनियम, वादनात हि भालचंद्र म्हात्रे हे अव्वल आहेत. शिवकालीन लाठी काठी उभ्याने नारळ फोडणे, शेरीपट्टाने पान कापणे, तलवार चालविणे या ऐतिहासिक खेळातही ते तरबेज आहेत. भालचंद्र म्हात्रे म्हणजे एक कलादालनच आहे , गोड स्वभावाचे सामाजिक बांधिलकी जपणारे,आज त्यांच्या कलेचा वारसा त्यांची दिपक व सुधीर हि दोन्ही मुले जपत आहेत. त्यांची मुलेही गायन वादन क्षेत्रात पारंगत आहेत. भालचंद्र म्हात्रे यांच्या कलेच्या सादरीकरणासाठी त्यांना अनेक ठिकाणी प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले आहे. आजही त्यांना सरकारकडून या कलेचे मानधन मिळत आहे. भालचंद्र म्हात्रे म्हणजे त्यांना भाऊ संबोधले जाते. भाऊंच्या वाढदिवसाचे शुभेच्छुक त्यांच्या पत्नी सुनिता म्हात्रे, मुलगा दिपक म्हात्रे सुन वर्षा म्हात्रे, मुलगा सुधीर म्हात्रे सुन सुप्रिया म्हात्रे, मुली रंजना पाटील जावयी रमाकांत पाटील, मुलगी सुरेखा घरत , जावयी अर्जुन घरत, मुलगी सुजाता म्हात्रे जावई वासुदेव म्हात्रे ,मुलगी भावना साबळे जावई समीर साबळे, नातसुना, नातजावई, नातवंडे, पोतवंडे असा त्यांचा मोठा परिवार आहे. वयाच्या १०० री कडे चाललेला हा प्रवास पण मनात मात्र अजूनही हिरवळ आहे, न थकता चालणे, काम करणे यामध्ये ते व्यस्त असतात. अशा या अष्टपैलू, हरहुन्नरी भालचंद्र म्हात्रे (भाऊ) यांना जन्म दिनाच्या आभाळभर शुभेच्छा.... आणि त्यांच्या मध्ये असलेल्या कलांना मानाचा मुजरा.

## शेतकऱ्याच्या मालाला कधी मिळणार योग्य भाव ?.सरकारच्या उदासिनतेमुळे राज्यातील शेतकरी त्रस्त. डॉ सुनील राऊत वनोजा.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**

**गजानन पवार.** महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्याच्या शेत मालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे.सरकारची उदासीनता याला जबाबदार असून शेतकऱ्याचा उत्पादन खर्चही निघणे मुश्किल झाले आहे. त्यांच्या मालाला योग्य भाव कधी मिळेल असा प्रश्न विचारण्यात येत आहे. अस्मानी सुलतानी सकंटाच्या सामना करीत शेतकरी शेती करतो. त्यातही शेतीप्रयागी खताच्या किमती शिखरावर मजुरीच्या दरात वाढ वाहतुकीचा खर्च करूनसुद्धा पीक




लेल्या मालाला कमी भावात बाजारात विकावे लागते. यामुळे त्यांच्यावर आर्थिक शेतकऱ्यावर संकटाचा सामना करावा लागत आहे. एकीकडे सल्फेट युरिया आणि फवारणीच्या औषधाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. तसेच मजुरीचे दर वाढले आहेत. वाहतुकीचा खर्च न परवडणारा तरीही कशीतरी शेती करून कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरू आहे. तरीही शेतातील मालाला योग्य तो भाव सरकारकडून मिळत नाही. नाईलाजाने शेतकऱ्यांना कमी किमतीत शेतमाल विकून आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. शेतातील मालाला भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांसमोर शेती करावी असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सरकारच्या धोरणामुळे शेतकऱ्यावर अन्याय होत असून नापिकीमुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. व कर्जबाजारी होत चालला आहे. अशी प्रतिक्रिया दैनिक युवक आधार च्या प्रतिनिधीशी बोलताना डॉ सुनील राऊत. वनोजा. यवतमाळ वाशिम लोकसभा लोकप्रिय खासदार संजय भाऊ देशमुख यांचे ते कट्टर समर्थक आहेत..

## आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेटपटू होण्यासाठी दिलीप वेंगसरकर देणार विनामुल्य प्रशिक्षण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

आदई सर्कल, नवीन पनवेल येथे पनवेल महानगरपालिकेच्या दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकादमी तर्फे १२, १४, १६ व १९ वर्षांखालील गटांसाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. ही निवड चाचणी ०१ मे ते ०४ मे २०२५ या कालावधीत सकाळी ७. ३० ते सकाळी १० पर्यंत आणि सायंकाळी ०४ ते सायंकाळी ६. ३० या वेळेत पार पडणार आहे. या निवड चाचणीसाठी इच्छुक खेळाडूंनी पांढऱ्या रंगाचा क्रिकेट युनिफॉर्म, क्रिकेट शूज परिधान करून हजर राहणे आवश्यक आहे. क्रिकेट युनिफॉर्म आणि शूज व्यतिरिक्त इतर सर्व बाबींची व्यवस्था दिलीप वेंगसरकर क्रिकेट ॲकॅडमीतर्फे करण्यात येणार आहे. तसेच जन्मतारखेचा अधिकृत दाखला (जन्म प्रमाणपत्र) सोबत आणणे अनिवार्य आहे.पात्रता निकष (जन्मतारीख): १२ वर्षांखालील गट : ०१/ ०९/



२०२३ नंतर जन्मलेले. १४ वर्षांखालील गट : ०१/ ०९/ २०११ नंतर जन्मलेले, १६ वर्षांखालील गट : ०१/ ०९/ २००९ नंतर जन्मलेले, १९ वर्षांखालील गट : ०१/ ०९/ २००६ नंतर जन्मलेले असे आहे. या निवड चाचणीसाठी येणाऱ्या खेळाडूंमधील १२, १४, १६ आणि १९ वयोगटातील प्रत्येकी २० खेळाडूंची या क्रिकेट प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येणार आहे. या सर्व खेळाडूंना स्वतः दिलीप वेंगसरकर प्रशिक्षण देणार आहेत. ही सर्व प्रक्रिया विनामुल्य असून, खेळाडूंनी आपले क्रिकेटचे कसब यावेळी दाखवून स्वतःला सिद्ध करायचे आहे. या प्रशिक्षणासाठीची निवड मे महिन्यात होणार असून, प्रशिक्षण मात्र ऑक्टोबर २०२५ ते मे २०२६ पर्यंत होणार आहे. निवड चाचणीसाठी भरघोस प्रतिसाद अपेक्षित असून, भविष्यातील क्रिकेटपटूंना संधी देण्याचे हे एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे, असे दिलीप वेंगसरकर यांनी सांगितले.

# इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शन,निर्मलरत्न चॅरिटेबल ट्रस्ट,दक्ष नागरिक पोलिस मित्र महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

### महाराष्ट्र अभिमान पुरस्कार"वितरण सोहळा उत्साहात संपन्न ..!

**दैनिक युवक आधार**
**ठाणे प्रतिनिधी**
**-गुरुनाथ तिरपणकर**

समाजाचे आपण काही देण लागतो,त्याप्रमाणे प्रत्येक व्यक्ती आपल्या परिने काम करत असते.काही दानशूर व्यक्ती आपले सर्वस्व समाजसेवेसाठी अर्पित करत असतात,पण समाजासाठी गोर गरीब गरजु गरजवंतांना मदतीचा हात देणारी दानशूर व्यक्ती म्हणजे रामजित (जीतु)गुप्ता सर.महाराष्ट्रातील पिडीत, कष्टाळू समाजातील गरजु गरजवंतांना सहकार्य व मदतीचा हात देणारी व्यक्ती रामजित गुप्ता अशी त्यांची ओळख आहे.समाजात अशा अनेक व्यक्ती आपआपल्या परीने समाजकार्य करत असतात त्यांचा योग्य तो सन्मान



व्हावा या अनुषंगाने रामजित गुप्ता सर यांच्या मार्गदर्शनाखाली इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शन,निर्मलरत्न चॅरिटेबल ट्रस्ट,दक्ष नागरिक पोलिस मित्र महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने ए.सी.क्लब हाऊस,लोढा आमरा,कोलशेत,ठाणे पश्चिम येथे"महाराष्ट्र अभिमान पुरस्कार"सोहळा आयोजित करण्यात आला होता.याप्रसंगी महाराष्ट्रातील शैक्षणिक,वैद्यकीय,उद्योग क्षेत्र, सांस्कृतिक,सामाजिक,कला,क्रीडा,आरोग्य,साहित्य,पत्रकारिता,शासकीय अधिकारी अशा विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणा-या त्या प्रतिभावंत व्यक्तींना त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन त्यांना आकर्षक सन्मानपत्र व सन्माचिन्ह मान्यवरांच्या हस्ते प्रदान करुन त्यांना गौरवांकीत करण्यात आले.याप्रसंगी व्यासपीठावर कर्नल रविंद्रजी त्रिपाठी,मिसेस स्टार महाराष्ट्र विजेता प्राची जैन,अभिनेत्री साक्षी नाईक,सिव्हील इंजिनिअर दिगंबर तायडे,मॉटीरेटर ज्योती सनये,वैद्यकीय मदत कक्षाचे न्यायिक सल्लागार धनाजी पवार,सोशल वर्क मध्ये पीएचडी केलेल्या डॉ.अनिता गुप्ता, मुंबईचे सेवानिवृत्त डीसीपी सीताराम न्यायनिर्गुणे,महिला उद्योजक कामिनी भोसले,बिल्डर-उद्योगपती अशोक जैन,दक्ष नागरिक पोलिस मित्र महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष राजेश भोसले,ॲन्टीपायरसी सेल मुंबई चे तपाशी अधिकारी रामजित गुप्ता आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रुपाली गायकवाड व रघुसिंग राजपूत यांनी सदाबहार, खेळीमेळीच्या वातावरणात उत्कृष्टरित्या केले. याप्रसंगी सर्व उपस्थित मान्यवरांनी कार्यक्रमाच्या आयोजनाची प्रशंसा केली तसेच रामजित गुप्ता यांच्या समाजकार्याचीही मुक्त कंठाने प्रशंसा केली.हा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा रविवार सोहळा यशस्वी करण्यासाठी सुलक्षणा कांबळे,गायत्री पांडे, राजकुमारी गुप्ता,दीपाली पाटिल, रामजित (जीतु)गुप्ता, सारिका सौदा, स्नेहल ओव्हळ,केतन साळगावकर, मंगेश गुप्ता,महेश गुप्ता,ओम पांडे रहूसिंह राजपूत, रुपाली गायकवाड, केतन म्हात्रे व सहका-यांनी अथक परिश्रम घेतले.शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## शालिवाहन पतसंस्थेच्या सिल्लोड शाखेचा प्रथम वर्धापन दिन विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड-** पैठण येथील शालिवाहन पतसंस्थेच्या सिल्लोड शाखेचा प्रथम वर्धापन दिन सोहळा सोमवार दिनांक २१ रोजी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. महाराष्ट्रातील पतसंस्थांसाठी रोल मॉडेल ठरलेल्या शालिवाहन पतसंस्थेच्या सामाजिक व बँकिंग क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल सिल्लोड शहर व तालुक्यातील सर्व ठेवीदार, ग्राहक, व्यापारी व विविध क्षेत्रातील सर्व मान्यवर व ग्रामस्थांनी शालिवाहन पतसंस्थेचे चेअरमन किशोर चौहान यांचे विशेष कौतुक केले. या वेळी आयोजित रक्तदान शिबिरात २५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. संस्थेचे अध्यक्ष किशोर चौहान यांचे कुशल नेतृत्व व सर्व संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र असलेल्या शालिवाहन पतसंस्थेच्या २७ वर्षात १३ शाखा कार्यरत असून ५ शाखा नियोजित आहेत. विविध सामाजिक क्षेत्रात अग्रेसर तसेच राज्यस्तरावरील बँको ब्ल्यु रिबन, दीपस्तंभ पुरस्कार प्राप्त शालिवाहन पतसंस्थेने मागील आर्थिक वर्षात २७५ कोटी व्यवसायाचा टप्पा करत ३०० कोटी व्यवसायकडे वाटचाल सुरू केली आहे. उपस्थितांनी या वेळी संस्थेच्या भावी वाटचालीसाठी शुभेचछा दिल्या. संस्थेचे सिल्लोड शाखा व्यवस्थापक अमोल चापे यांनी सर्वांचे स्वागत केले. या प्रसंगी माजी प्राचार्य नामदेवराव चापे,



डॉ.बाबासाहेब जाधव, गणेश अर्बन पतसंस्थेचे चेअरमन श्रीरंग पाटील साळवे, जनता सहकारी पतसंस्थेचे चेअरमन मकरंद कोरडे, स्पार्कल इंग्लिश स्कूल च्या चेअरमन सौ. अर्चना आहिरे, सचिव देवरे सर, किसान महासंघाचे जिल्हाध्यक्ष पुंडलिक चापे, संत एकनाथ विद्यालयाचे मुख्याध्यापक दिनेश गोंगे, सी ए विवेक कर्नावट, युवा उद्योजक राहुल सोनवणे, द्वारकादास वाघ, वेदप्रकाश अग्रवाल, भिकचंद कर्णावट, विक्रांत घोडसे, गुलाबसिंग हजारी, सुरेश जयस्वाल, विठ्ठल क्षीरसागर, अंसार शेख, योगेश वडगावकर, बाबासाहेब संकपाळ, अमित साबळे, मुसेफ शहा, मुश्ताक शेख आदींसह मोठ्या संख्येने सभासद, ठेवीदार व ग्रामस्थ उपस्थित होते. शालिवाहन पतसंस्थेचे मुख्य अधिकारी शिवाजी घोडसे, रामदास संदलसे, ज्ञानेश चौहान यांचे सह सिल्लोड शाखेचे कृष्णा पडोळ, संजय सुरडकर, अनिल भाग्यवंत, गणेश दांडगे, अंतिमा पांडे, कन्नड शाखेचे सचिन नेवगे, योगेश पवार सत्यसाई ब्लडबँके चे डॉ. महेंद्रसिंग चौहान, वाकडीकर व सर्व सेवक आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## पहलगाम येथील भ्याड अतिरेकी हल्ल्याच्या निषेधार्थ लिंबागणेश येथे निदर्शने :- डॉ.गणेश ढवळे

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)**

– जम्मू –काश्मिरच्या पहलगाम मधील "मिनी स्वित्झर्लंड" म्हणून ओळखले जाणारे "बैसरण खोरे" येथील निसर्गरम्य परिसरात पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांवर पाक धार्जिणे अतिरेक्यांनी बेछुटपणे गोळीबार करत हल्ला केला. या भ्याड हल्ल्यात २८ पर्यटक मृत्युमुखी पडले असुन अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. या हल्ल्यानंतर देशभर पाकिस्तान विरोधात संतापाची लाट उसळली असून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दिनांक २४ एप्रिल गुरुवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे भ्याड अतिरेकी हल्ल्याच्या निषेधार्थ निदर्शने करण्यात आली. या वेळी हिंदू – मुस्लिम भाई भाई म्हणत "पाकिस्तान मुर्दाबाद" हल्लेखोरांना फाशी द्या" पाकिस्तान विरोधी घोषणाबाजी करण्यात आली. हल्लेखोर आणि त्या मागील सुत्रधार यांना तातडीने अटक करून फाशीची शिक्षा देण्यात यावी. अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक बीड यांच्या




मार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री, राज्यपाल, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना करण्यात आली. भारत सरकारने पाकिस्तान विरोधात घेतलेल्या सिंधू पाणी वाटप करार रद्द, अटारी सिमेवरील तपास नाका बंद, पाकिस्तानी नागरीकांना व्हिसा नाही, उच्चायुक्तालयातील लष्कर, नौदल आणि हवाई सल्लागार पदे रिक्त आदी निर्णयांचे स्वागत करण्यात आले. या वेळी आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, ॲड.गणेश वाणी, अशोकराजे वाणी, महादेव कुदळे, शेख शफीभाऊ, समीर शेख, कैलास काटे, बालाजी निर्मळ, शंकर निर्मळ, हरिओम क्षीरसागर, सुरेश निर्मळ, कचरू रणखांब, अमोल वक्ते, भगवान मोरे, आश्रुबा गिरे, संतोष भोसले, नाना वाणी, जनार्दन वाणी, राजेंद्र वायभट यांच्या सह आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# उल्हास प्रभात राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा 2025 संपन्न

**दैनिक युवक आधार**
**बदलापूर वार्ताहर**

बदलापूर मधून 31 वर्षापासून प्रसिद्ध होणारे वृत्तपत्र उल्हास प्रभात चा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा नुकतेच संपन्न झाला या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे, बदलापूर-अंबरनाथ बिल्डर असोसिएशनचे अध्यक्ष संजय जाधव, सकाळचे मुख्य संपादक राहुल गडपाले, उल्हास प्रभातचे संपादक डॉ. श्री. गुरुनाथ बनोटे यांच्यासह विशेष पुरस्कार विजेते चंद्रकांत खडकबाण, कैलास मनोरे, रवी कुंभार, गजानन टोहके, एड. संतोष मळवीकर, देवेसिंग




राजपूत, डॉ. चित्रलेखा माने व्यासपीठावर उपस्थित होते.
यावेळी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या राज्यभरातील 70 जणांना विविध पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. अध्यक्षीय भाषणात आमदार किसन कथोरे यांनी सर्व पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे कौतुक करत अशी व्यक्तिमत्व समाजासमोर आणण्याचे काम करणाऱ्या उल्हास प्रभात चे संपादक डॉ. गुरुनाथ बनोटे यांचे कौतुक केले गेली 12 वर्षापासून महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना समाज रत्न, आरोग्य रत्न, शिक्षण रत्न अशा विविध प्रकारचे पुरस्कार देऊन गौरविण्यात येत आहे. राज्यभरातून आलेल्या दिवाळी अंकांमधून 13 दिवाळी अंक निवडण्यात आले यामध्ये प्रथम क्रमांक अवतरण सकाळ मुंबई, द्वितीय क्रमांक उद्याचा मराठवाडा नांदेड, तृतीय क्रमांक अपेक्षा कोथरूड पुणे, सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक फोर्ट ट्रस्ट कामगार मुंबई ,सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक वेदांत श्री पुणे, सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक जमाना धमाका अहमदनगर, रणांगण नवी मुंबई, नृत्यवकाश पुणे, साहित्य सवाना नाशिक, सुभाषित नाशिक , पुरुष स्पंदन मुंबई, अर्थशक्ती मुलुंड यांना उत्कृष्ट व सर्वोत्कृष्ट पुरस्कार देऊन गौरविण्यात आले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकेश दामोदरे यांनी केले तर कार्यक्रमाची प्रस्तावना आरती नेरपगार यांनी केले या कार्यक्रमासाठी विशेष मेहनत सुगंधा बनोटे, सहसंपादक अतुल नेरपगार, गौरव बनोटे, गुरुनाथ तिरपनकर, प्रमोद हरपुडे, सौरभ बनोटे, भावेश चंद्रा आदींनी अथक परिश्रम घेऊन हा कार्यक्रम पार पडला. हा सोहळा काटदरे मंगल कार्यालयात पार पडला.

द•ख•ल

# अवैध दारू विक्री विरोधात महिलांचं वारला येथे पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन.

## अनसिंग पोलीस प्रशासनाची उडाली धांदल.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार.**

वाशिम तालुक्यातील वारला येथे अवैध दारू विक्री विरोधात आजूबाजूच्या गावातील महिलांनी थेट शोले स्टाईल आंदोलन छेडत प्रशासनाला हादरवून सोडले. 23 एप्रिल रोजी वज्रदेवी महिला विकास संघटनेच्या सदस्यांनी गावातील पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केले. वाशिम जिल्ह्यात सोनगव्हाण वारला टणका पांगरखेडा वाई कृष्णा याचा अनेक ठिकाणी खुल्या अवैध दारू विक्री होत असल्याने युवक वर्ग अनेक कुटुंब उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. प्रशासनाकडून यासंदर्भात ठोस पावले उचलली जात नसल्यामुळे महिलांच्या संयमाचा अंत झाला. वज्र देवी महिला संघटनाच्या संस्थापक अध्यक्ष आरती संतोष ठोके यांनी या आधीच निवेदनाद्वारे प्रशासनाला इशारा दिला होता की जर अवैध दारू विक्री विरोधात त्वरित कारवाई झाली नाही तर महिलांना जलकुंभ किंवा मोबाईल टॉवर वर चढून आंदोलन करावे लागेल. मात्र प्रशासनाने याची दखल न घेतल्यामुळे अखेर 23 एप्रिल रोजी महिलांनी कृतीत उतरून वारला येथे पाण्याच्या टाकीवर चढून घोषणा देऊन आंदोलन करीत प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले.





**दैनिक युवक आधार-** काश्मीर मधील पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात,आपले शूर जवान, पर्यटक व निष्पाप नागरिक शहीद झाले आहेत.त्यांच्या देशसेवेच्या बलिदानास आणि शौर्याला सामूहिक श्रद्धांजली अर्पण करून
नवी मुंबई आरटीओ कार्यालय येथे प्रत्येक गुरुवारी मोफत व्यसनमुक्ती जनजागृती संवाद नवीन शिकाऊ लर्निंग काढण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना मोफत व्यसनमुक्ती जनजागृती बाबत मार्गदर्शन संवाद

# पाटोदा येथे जागतिक पशु वैद्यकीय दिना निमित्त अँटी रेबीज लसीकरण शिबिराचे आयोजन...

## पाटोदा शहरासह तालुक्यातील पशुपालकांनी लाभ घ्यावा.

**दैनिक युवक आधार**




**पाटोदा (प्रतिनिधी) -** प्राणी हे मानवाचे हितचिंतक, साथीदार आणि शेतीच्या दृष्टीने उपयुक्त घटक आहेत. त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे ही आपल्या साठी जबाबदारीची बाब असून, जनजागृतीसाठी दरवर्षी एप्रिल महिन्याच्या शेवटच्या शनिवारी जागतिक पशु वैद्यकीय दिन साजरा केला जातो. यंदा हा दिवस २६ एप्रिल २०२५ रोजी साजरा केला जाणार आहे. या दिना निमित्त पशु संवर्धन विभाग, पाटोदा यांच्या वतीने पशु वैद्यकीय दवाखाना, पाटोदा येथे शनिवारी २६ एप्रिल रोजी सकाळी-९:३० ते ११:०० वाजेपर्यंत पाळीव प्राण्यांसाठी श्वानदंश (अँटी रेबीज) प्रतिबंधात्मक लसीकरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमात सर्व पशुपालकांनी सहभाग घ्यावा व आपल्या लाडक्या पाळीव प्राण्यांना रेबीज प्रतिबंधक लस द्यावी. असे आवाहन पाटोदा पशु संवर्धन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. रेबीजसारखा जीवघेणा आजार टाळण्यासाठी लसीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे. त्या मुळे जास्तीत जास्त नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. असे आवाहन करण्यात आले आहे.

# चिपळूण राष्ट्रवादीतर्फे पहलगाम अतिरेकी हल्ल्याचा निषेध

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार चिपळूण प्रतिनिधी**

काश्मीरातील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा चिपळूण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून चिपळूण शिवाजी चौक(चिंचनाका)येथे चिपळूण संगमेश्वर विधानसभा मतदारसंघाचे आमदार शेखरजी निकम सर यांच्या मार्गदर्शनाखाली जाहीर निषेध व उपविभागीय पोलिस अधिकारी यांना निवेदन दिले.
आमदार शेखर निकम, प्रदेश उपाध्यक्ष शौकतभाई मुकादम, प्रदेश चिटणीस जयंद्रथ खताते,ज्येष्ठ नेते दादा साळवी,पांडूशेठ माळी, राजाभाऊ चाळके, तालुकाध्यक्ष नितीन उर्फ अबूशेठ ठसाळे, शहर अध्यक्ष मिलिंद कापडी, माजी सरपंच दशरथ दाभोळकर, प्रादेशिक युवक सचिव डॉ.राकेश चाळके, महिला प्रदेश सरचिटणीस दिशा दाभोळकर, महिला जिल्हा कार्याध्यक्ष रिहाना बिजले, महिला तालुकाध्यक्ष जागृती शिंदे, महिला शहराध्यक्ष अदिती देशपांडे, महिला विधानसभा क्षेत्राध्यक्ष मनाली जाधव, महिला उप तालुकाध्यक्ष पूर्व




अहिरे, युवक तालुका अध्यक्ष निलेश कदम, अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष समीर काझी, शहर सचिव मनोज जाधव, उदय ओतारी, अल्लाद यादव, सचिन साडविलकर, बाबू मोहिते, राजू सुतार, इम्रान खतीब, खालीद पटाईत, रोहन इंगवले, नूरभाई बिजले, संकल्प सुर्वे, राजेंद्र चाळके, प्रभाकर सैतवडेकर, लतीफ परकार, सचिन गमरे, उस्मान सय्यद, विकास गमरे, सलीम पालोजी, बिलाल पालकर, गणेश भुरण,शिंदे सर, अविनाश हरधारे, शिवाजी गोटल,विकास महाडिक, अतिश पवार,साई पवार आदी पदाधिकारी व कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

# क्रेनच्या चाकाखाली आल्याने दुचाकीस्वाराचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

क्रेनच्या चाकाखाली आल्याने एका दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना तळोजा गावाच्या कमानीजवळ घडली. तळोजा पोलिसांनी या अपघाताला क्रेन चालकाला जबाबदार धरून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे. प्रदीप प्रल्हाद भालेकर (34) असे या अपघातात मृत्यू झालेल्याचे नाव असून, ते उलवे सेक्टर-2 मधील शक्ती अव्हेन्यु इमारतीत कुटुंबासह राहत होते. प्रदीप हे सिव्हील कॉण्ट्रक्टर म्हणून काम करत होते. कामानिमित्त तळोजा गाव येथे मोपेड दुचाकीवरून ते गेले होते. तळोजा गावाच्या कमानीजवळ क्रेनच्या सहाय्याने काम सुरू असताना प्रदीप यांनी क्रेनच्या डाव्या बाजूने जाण्याचा प्रयत्न केला. या वेळी त्याच्या दुचाकीला क्रेनची धडक लागून प्रदीप खाली पडून क्रेनच्या चाकाखाली आल्याने गंभीर जखमी झाले व काही वेळातच त्यांचा मृत्यू झाला. या अपघातातील क्रेन चालकाच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात झाल्याचे समोर आल्यानंतर तळोजा पोलिसांनी क्रेन चालक अबिद चौगुले याच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

अवैध दारू विक्री विरोधात महिलांचं वारला येथे पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन.

अनसिंग पोलीस प्रशासनाची उडाली धांदल.

दैनिक युवक आधार
उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम
गजानन पवार.




वाशिम तालुक्यातील वारला येथे अवैध दारू विक्री विरोधात आजूबाजूच्या गावातील महिलांनी थेट शोले स्टाईल आंदोलन छेडत प्रशासनाला हादरवून सोडले. 23 एप्रिल रोजी वज्रदेवी महिला विकास संघटनेच्या सदस्यांनी गावातील पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केले. वाशिम जिल्ह्यात सोनगव्हाण वारला टणका पांगरखेडा वाई कृष्णा याचा अनेक ठिकाणी खुल्या अवैध दारू विक्री होत असल्याने युवक वर्ग अनेक कुटुंब उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. प्रशासनाकडून यासंदर्भात ठोस पावले उचलली जात नसल्यामुळे महिलांच्या संयमाचा अंत झाला. वज्र देवी महिला संघटनाच्या संस्थापक अध्यक्ष आरती संतोष ठोके यांनी या आधीच निवेदनाद्वारे प्रशासनाला इशारा दिला होता की जर अवैध दारू विक्री विरोधात त्वरित कारवाई झाली नाही तर महिलांना जलकुंभ किंवा मोबाईल टॉवर वर चढून आंदोलन करावे लागेल. मात्र प्रशासनाने याची दखल न घेतल्यामुळे अखेर 23 एप्रिल रोजी महिलांनी कृतीत उतरून वारला येथे पाण्याच्या टाकीवर चढून घोषणा देऊन आंदोलन करीत प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले.

# संघाच्या तालमीतला भारतीय जनता पार्टीचा नवनियुक्त घाटंजी तालुका प्रमुख विजयसिंग बैस

## घाटंजी भाजप तालुका अध्यक्षपदी विजयसिंग बैस यांची निवड; कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी (प्रतिनिधी - महेश पेंन्दोर)**

**घाटंजी** : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संस्कारातून घडलेले आणि आमदार प्रा. राजूभाऊ तोडसाम यांचे कट्टर समर्थक विजयसिंग बैस यांची भारतीय जनता पार्टीच्या घाटंजी ग्रामीण तालुका अध्यक्षपदी निवड झाली आहे. त्यांच्या निवडीने घाटंजी तालुक्यातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.
घाटंजी येथील यलएस डी हॉलमध्ये



झालेल्या बैठकीत भाजपचे तालुका निरीक्षक दिनकर पावडे, शहर निरीक्षक अनिल राजूरकर आणि आमदार राजू तोडसाम यांच्या उपस्थितीत विजयसिंग बैस यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. विजयसिंग बैस यांचा प्रवास एका सामान्य कार्यकर्त्यापासून तालुका प्रमुखपदापर्यंतचा आहे. लहानपणापासूनच संघाच्या शाखेत रुजलेले राष्ट्रप्रेम आणि समाजसेवेचे बीज आज त्यांच्या नेतृत्वातून अंकुरित होत आहे. पक्षाशी एकनिष्ठ राहून त्यांनी गावागावात कार्यकर्त्यांचे मजबूत जाळे विणले आहे. ग्रामीण भागातील समस्यांची जाण आणि त्या सोडवण्याची तळमळ यामुळेच ते कार्यकर्त्यांमध्ये लोकप्रिय झाले आहेत. "कार्यकर्ता हा पक्षाचा श्वास असतो आणि कार्यकर्त्यांच्या मेहनतीनेच नेता मोठा होतो," हे विजयसिंग बैस यांचे विचार त्यांच्या कार्याला दिशा देणारे आहेत. पक्षाने कार्यकर्त्यांना दिलेला सन्मान आणि कार्यकर्त्यांनी पक्षाला दिलेला वेळ या दोन्ही गोष्टी त्यांच्यासाठी महत्त्वाच्या आहेत.
विजयसिंग बैस यांच्या नेतृत्वाखाली घाटंजी तालुक्यात भाजप एक नवा इतिहास रचेल, असा विश्वास कार्यकर्त्यांना आहे. त्यांच्या कुशल संघटन कौशल्यामुळे आणि सामाजिक बांधिलकीमुळे ते निश्चितच पक्षाला नव्या उंचीवर नेतील, यात शंका नाही.

# नफा मिळवून देण्याच्या आमिषाने घातला 50 लाखांचा गंडा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

शेअर्स गुंतवणुकीमध्ये जास्त फायदा मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका सायबर टोळीने खारघरमध्ये राहणाऱ्या 67 वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला आयआयएफएल कंपनीच्या नावाने तयार करण्यात आलेल्या बनावट वेबपेज तयार करून त्यांच्याकडून तब्बल 50 लाख रुपये उकळल्याचे उघडकीस आले आहे. गत फेब्रुवारी महिन्यात ते 67वर्षीय ज्येष्ठ त्यांच्या घरी असताना सायबर टोळीने त्यांचा मोबाईल नंबर आयआयएफएल सिक्युरिटीज लि. या नावाने तयार करण्यात आलेल्या बोगस व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये अॅड केला होता. या व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये सहभागी असलेले अनेक सदस्यांकडून शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करत असून, त्यांना चांगला नफा मिळत असल्याचे त्यांना चॅटिंगद्वारे भासवण्यात येत होते. आयआयएफएल ही प्रसिद्ध फायनान्स कंपनी असल्याची या ज्येष्ठ नागरिकाला माहिती होती. त्यामुळे यांनी व्हॉट्सअॅप ग्रुपवरील सदस्यांच्या चॅटिंगवर विश्वास ठेवून सदर कंपनीमध्ये गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला. त्यावर या टोळीने पाठवलेल्या लिंकद्वारे या ज्येष्ठ नागरिकाने आयआयएफएल मार्केट या वेबपेजमध्ये आपले नाव रजिस्टर करून घेतले. त्यावर या चोरट्यांनी त्यांना आयआयएफएल सिक्युरिटीज लि. या ग्रुपवर कोणत्या शेअर्समध्ये व आयपीओमध्ये कशी गुंतवणूक करायची याबाबतची माहिती सांगितली. त्यानुसार या ज्येष्ठ नागरिकाने शेअर्समध्ये गुंतवणूक सुरू केली. दरम्यान, सायबर टोळीने या ज्येष्ठ नागरिकाला नफा झाल्याचे भासवून 6 हजार रुपये त्यांच्या बँक खात्यावर पाठवून देत त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर या टोळीने शेअर्स, ब्लॉक ट्रेडिंग, क्यूआयपी तसेच आयपीओ खरेदी करण्याच्या बहाण्याने तसेच इतर वेगवेगळी कारणे सांगत 18 फेब्रुवारी ते 24 मार्च 2025 या कालावधीत या ज्येष्ठ नागरिकाकडून 50 लाख रुपये उकळले. त्यानंतर त्यांना गुंतवणूक परताव्यासह 11 कोटी 80 लाख 87 हजार रुपयांचा लाभ झाल्याचे आयआयएफएल मार्केट या पेजवर दाखवण्यात आले. मात्र, या ज्येष्ठ नागरिकाने त्यातील काही रक्कम काढण्याचा प्रयत्न केला असता, या टोळीने त्यांना नफा रकमेवर 5 टक्के मॅनेजमेंट सर्व्हिस शुल्क भरल्यानंतरच त्यांना रक्कम काढता येईल, असे सांगितले. या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे या ज्येष्ठ नागरिकाच्या लक्षात येताच त्यांनी सायबर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. इंडिया इन्फोलाइन फायनान्स लि. ही कंपनी भारतातील एक प्रसिद्ध फायनान्स कंपनी असून, या कंपनीचे मार्केटमध्ये मोठे नाव आहे. याचाच फायदा उचलत सायबर टोळीने आयआयएफएल या कंपनीच्या नावाने बनावट वेबपेज तयार करून त्याद्वारे या ज्येष्ठ नागरिकाची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे.

# २४ वर्षीय महिलेचे आणि ५५ वर्षीय पुरूष हृदयरोग रुग्णांचे प्राण अपोलोने वाचवले

## पल्मनरी एम्बोलिजम आणि मायोकार्डियल इन्फार्क्शन हृदयरोग रुग्णांना मिळाले जीवनदान

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई, वार्ताहर**

२४ एप्रिल २०२५ : अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई (AHNM) ने आपल्या प्रगत हृदयरोग देखभाल क्षमता पुन्हा एकदा दर्शवत, अलीकडेच एका २४ वर्षीय महिलेचे आणि ५५ वर्षीय पुरूषाचे प्राण वाचवले. यशस्वी उपचार करण्यात आलेल्या दोन केसेसपैकी एक पल्मनरी एम्बोलिजम आणि दुसरी मायोकार्डियल इन्फार्क्शनची होती.अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईतील इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजीचे वरिष्ठ सल्लागार डॉ. ब्रजेश कुंवर यांनी वैद्यकीय व्यावसायिकांच्या मल्टी-डिसिप्लिनरी टीमच्या मदतीने दोन्ही केसेसमध्ये उपचारांचे नेतृत्व केले. फुफ्फुसांच्या धमन्यांमध्ये रक्ताच्या गुठळ्या झाल्यामुळे पल्मोनरी एम्बोलिजम होतो. यामध्ये जीवाला धोका असू शकतो. मृत्युदर ६०% पर्यंत आहे. मायोकार्डियल इन्फार्क्शन (एमआय), ज्याला सामान्य भाषेत हृदयविकाराचा झटका म्हणून ओळखले जाते, ते हृदयाच्या स्नायूंना होणारा रक्तपुरवठा अचानक बंद पडल्यामुळे होते. भारतात, एमआय हे मृत्युचे एक




प्रमुख कारण आहे आणि भारतात एमआय बहुतेकदा पाश्चात्य देशांपेक्षा वयाच्या एक दशक आधी सुरू होते. दोन्ही केसेसमध्ये रुग्ण जीवघेण्या स्थितीत होते - अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईमध्ये दाखल केले तेव्हा श्रीमती पूजा आणि श्री संजीव सेठ यांची प्रकृती खूपच गंभीर होती. पण, डॉ. कुंवर आणि त्यांच्या टीमच्या प्रयत्नांमुळे, दोघांच्या तब्येतीमध्ये उल्लेखनीय सुधारणा झाली. या केसेसमध्ये मिळालेल्या यशाने टीमच्या क्षमता सिद्ध केल्या. डॉ.ब्रजेश कुंवर,वरिष्ठ सल्लागार, इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजी, अपोलो हॉस्पिटल्स, नवी मुंबई म्हणाले,"पहिल्या केसमध्ये, २४ वर्षीय श्रीमती पूजा यांना पहाटे २ वाजता दाखल करण्यात आले, तेव्हा त्यांना गंभीर पल्मनरी एम्बोलिजमचे निदान करण्यात आलेले होते. या स्थितीत फुफ्फुसांच्या धमनीमध्ये गुठळ्यांमुळे अडथळा निर्माण होतो, त्यामुळे रुग्णाला त्वरित उपचारांची आवश्यकता असते. अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई येथे दाखल होताच सर्व आपत्कालीन कार्डियाक प्रोटोकॉलची खात्री करून रुग्णाला ताबडतोब प्रगत कॅथ लॅबमध्ये नेण्यात आले. त्वरित उपचारांमुळे श्रीमती पूजा यांची प्रकृती खूप सुधारली. त्यांना ३ दिवसांत घरी सोडण्यात आले. अशा प्रकारे, एका तरुणीचा जीव वाचला. आज श्रीमती पूजा त्यांच्या गावी आपल्या प्रियजनांसोबत सुट्टीचा आनंद घेत आहेत. दुसऱ्या केसमध्ये, ५५ वर्षीय श्री संजीव सेठ यांना मोठ्या प्रमाणात मायोकार्डियल इन्फार्क्शन झाल्याने अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईमध्ये दाखल करण्यात आले. कुटुंब खूप ठाम होते आणि आम्ही इम्पेला प्लेसमेंट करण्याचा निर्णय घेतला. इम्पेला हे कृत्रिम हृदय आहे. या प्रक्रियेनंतर, श्री संजीव यांची तब्येत बरी होऊ लागली. त्यांनी उत्तम प्रतिसाद देण्यास सुरुवात केली आणि आम्ही त्यांचे व्हेंटिलेटर बाजूला केले. सहाय्यक देखभालीमुळे त्यांची तब्येत बरी झाली आणि त्यांना घरी सोडण्यात आले. या दोन्ही केसेस गुंतागुंतीच्या होत्या आणि अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईतील डॉक्टरांच्या मल्टी-डिसिप्लिनरी टीमच्या मदतीने त्यांच्यावर यशस्वीरित्या उपचार करण्यात आले. रायगड येथील रहिवासी श्रीमती पूजा स्वतःचा अनुभव सांगत होत्या, "मला छातीत तीव्र वेदना होत होत्या आणि श्वास घेण्यास त्रास होत होता. मी उपचारांसाठी रुग्णालयात गेले, तिथे त्यांनी मला पल्मोनरी एम्बोलिजम असल्याचे निदान केले आणि मला अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई येथे रेफर केले. डॉ. ब्रजेश यांनी अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईमध्ये माझ्यावर उपचार केले आणि मला लगेचच माझ्या तब्येतीत सुधारणा होत असल्याचे जाणवले. माझा जीव धोक्यात होता, पण दुसऱ्या दिवशी सकाळी मी बरी झाले. माझा जीव वाचवल्याबद्दल डॉ. ब्रजेश आणि त्यांच्या टीमची मी खूप आभारी आहे."

# शिवसेना प्रवक्त्या व उपनेत्या किशोरीताई पेडणेकर यांनी केले देसले कुटुंबियांचे सांत्वन



**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या प्रवक्त्या व उपनेत्या किशोरीताई पेडणेकर यांनी आज खांदा वसाहतीमध्ये राहत असलेल्या देसले कुटुंबियांची भेट घेवून त्यांचे सांत्वन केले.
मंगळवारी दुपारी जम्मू आणि काश्मीरच्या पहलगामजवळील बैसरन येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या 28 नागरिकांमध्ये पनवेलमधील खांदा कॉलनी येथील रहिवासी स्व. दिलीप देसले यांचा समावेश होता. त्यांचे घरी जाऊन आज शिवसेना प्रवक्त्या व उपनेत्या किशोरीताई पेडणेकर यांनी शोकाकुल कुटुंबीयांची भेट घेतली आणि सांत्वन केले. यावेळी महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख रेवती सपकाळ, तालुकाप्रमुख सुजाता कदम, शहर संघटक अर्चना कुळकर्णी, ज्योती मोहिते, संगीता राऊत, मालती पिंगळा, नवीन पनवेल शहरप्रमुख यतीन देशमुख, कळंबोली शहरप्रमुख सुर्यकांत म्हसकर, पनवेल शहरप्रमुख प्रवीण जाधव, युवासेना महानगरप्रमुख अवचित राऊत, युवा सेना जिल्हाधिकारी पराग मोहिते, सनी टेमघरे आदींसह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

## वैद्यकीय अधिकाऱ्यांवरील अन्याय कधीही खपवून घेणार नाही - डॉ तपसे CAGMO राज्याध्यक्ष

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी- किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**



ग्रामीण रुग्णालय, किल्लारी (ता . औसा , जि . लातूर) येथील गट-अ वैद्यकीय अधिकारी यांच्यावर दि. 18 एप्रिल 2025 रोजी किल्लारी पोलीस स्टेशनमध्ये झालेल्या मारहाणीचा कास्ट्राईब राजपत्रीत वैद्यकीय अधिकारी संघ महाराष्ट्र राज्य तर्फे आम्ही तीव्र शब्दांत निषेध करतो . ही घटना केवळ एका डॉक्टरवर झालेला हल्ला नसून, ती संपूर्ण वैद्यकीय व शासकीय सेवेत कार्यरत कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेवर गंभीर परिणाम करणारी आहे. त्या मुळे याची तातडी ने चौकशी करून कठोर पावले उचलण्याची गरज आहे.आज एका वैद्यकीय अधिकाऱ्यावर वेळ आली आहे भविष्यात कोणत्याही वैद्यकीय अधिकाऱ्यांवर अन्याय वा हल्ले होऊ नयेत याकरता शासनाने उपाययोजना कराव्यात.सदरील डॉक्टर यांना न्याय न मिळाल्यास आंदोलन उभारले जाईल. जनतेचे जीव वाचवणाऱ्या जीवांचे रक्षण व्हावे हीच मागणी कॅगमो संघटनेची आहे. लवकरच या घटनेचा पाठपुरावा मंत्रालय मुंबई येथे करण्यात येईल असे कॅगमो राज्याध्यक्ष डॉ दत्ता तपसे, सचिव डॉ निलेश भालेराव, कोषाध्यक्ष डॉ प्रज्ञा तरकसे, कार्याध्यक्ष डॉ कल्याण शिंदे यांनी कळविले आहे.तसेच सदर वैद्यकीय अधिकारी सोबत आहोत.

## आमदार विक्रांत दादा पाटील यांच्या पुढाकाराने सिडकोच्या "माझ्या पसंतीचे घर" योजनेतील हजारो नागरिकांना दिलासा देण्याचा प्रयत्न!

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, वार्ताहर**



दि.24 एप्रिल 2025 : सिडकोच्या "माझ्या पसंतीचे घर "या बहुचर्चित लॉटरी योजनेत सामान्य आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना स्वप्नातील हक्काचे घर मिळावे यासाठी सिडको मार्फत योजना राबवण्यात आली होती. मात्र घरांच्या आवाजवी किंमती,जाहिरातीतील आश्वासने आणि प्रत्यक्ष इरादा पत्रातील तफावत यामुळे हजारो नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता .नागरिकांच्या हितासाठी आमदार विक्रांत दादा पाटील यांनी पुढाकार घेत सिडकोचे अतिरिक्त व्यवस्थापकीय संचालक श्री शंतनू गोयल यांच्या उपस्थितीत एक महत्त्वपूर्ण बैठक आयोजित केली. या बैठकीत आमदार विक्रांत दादा पाटील यांनी सिडकोच्या कारभारातील त्रुटींवर बोट ठेवत जाहिरातीतील आश्वासित घरांचे 322 चौरस चौरस फूट चटई क्षेत्रा ऐवजी प्रत्यक्षात 292 चौरस फूट इतके कमी क्षेत्र देत असल्याने ते मान्य नाही, कन्फर्मेशन अमाऊंट भरण्याची मुदत संपुष्टात आल्याने ती वाढवून देण्यात यावी, मेन्टेनन्स रक्कम दोन वर्ष न घेण्याचे आश्वासन असूनही प्रत्यक्षात ती आकारली जात आहे ते मान्य नाही, घरांच्या किंमती बाजारभावापेक्षा जास्त असून त्या रेडीरेकनरच्या किंमतीच्या आसपास ठेवून कमी करण्यात याव्यात तसेच बँकेकडून कर्ज नाकारले गेल्यास कन्फर्मेशन अमाऊंट जप्त न करता परत करण्यात यावी अशा मागण्यांवर बैठकीत जोरदार आवाज उठविला.या सर्वच विषयांवर विस्तृत चर्चा करत १- १मुद्दा पटवून दिल्याने सिडको प्रशासनाने सदर विषयांवर सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. दा पाटील यांनी केलेल्या मागण्यानुसार घरांचे चटई क्षेत्र कमी न करता आता 322 चौरस फूट क्षेत्र देण्यात येणार आहे. तसेच मेन्टेनन्स शुल्क आकारले जाणार नाही, कन्फर्मेशन रक्कम भरण्यासाठी मुदत संपलेल्या नागरिकांना मुदतवाढ देण्यात येणार आहे, घरांच्या वाढीव किमती कमी करण्यासंदर्भात सकारात्मक निर्णय करणे विषयी सिडको कडून अनुकूलता दर्शवली आहे. तसेच नागरिकांना बँकेकडून कर्ज नाकारल्यास भरलेली कन्फर्मेशन रक्कम जप्त न करता परत करणे विषयात सकारात्मक विचार करणे विषयी सिडको प्रशासनाने अनुकूलता दाखवली आहे. वरील सर्व विषयांवर सिडकोच्या माध्यमातून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने हजारो नागरिकांना दिलासा मिळाला आहे व जनसामान्यांसाठी संघर्ष करणारे नेतृत्व म्हणून ओळख असणाऱ्या आमदार विक्रांत दादा पाटील यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. या बैठकीस सिडकोचे अतिरिक्त व्यवस्थापकीय संचालक श्री शंतनू गोयल, कोकण म्हाडाचे माजी सभापती श्री बाळासाहेब जी पाटील, सिडकोचे अन्य वरिष्ठ अधिकारी आणि नागरीक उपस्थित होते.

## १९ वर्षाखालील सहाव्या राष्ट्रीय खेलो इंडिया खो खो स्पर्धेसाठी राज्याच्या संघात रत्नागिरी च्या दिव्या पाले हिची निवड

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार चिपळूण प्रतिनिधी**



दि गया (बिहार) येथे होणाऱ्या १९ वर्षाखालील सहाव्या राष्ट्रीय खेलो इंडिया खो खो स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्याच्या संघात रत्नागिरी च्या दिव्या पाले हिची निवड झाली आहे ही स्पर्धा ४ मे ते या दरम्यान गया येथे पार पडणार आहे. देशभरामद्ये दर्जेदार खेळाडू घडावेत या उद्देशाने खेलो इंडिया स्पर्धेचे आयोजन करण्यास सुरुवात केली असून त्यामध्ये खो खो या क्रिडाप्रकारांचा समावेश करण्यात आला असून क्रिडा विभागाकडून घेण्यात येणारी निवड चाचणी नुकतीच पुणे बालेवाडी क्रिडागणावर संपण झाली. अभ्यकर कुलकर्णी रत्नागिरी विद्यालखयात शिक्षण घेणारी विव्या पाल्ये मुळची हातखंबा खेडशी येथील असुन तीला राष्ट्रीय खो खो प्रशिक्षक पकंज चवडे राज्य खो खो असोसिएशन चे माजी सचिव संदिप तावडे क्रिडा शिक्षक विनोद मयेकर याचे मार्गदर्शन मिळाले. तीच्या निवडीनंतर अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य मकरंद साखळकर उपप्राचार्य सुनील गोसावे यासह अनेक मान्यवरांनी तीच्या यशाबद्दल अभिनंदन केले

## १० लाखांवरील लक्झरी वस्तूंवर १ टक्का टीसीएस

### आयकर विभागाचा निर्णय, २२ एप्रिलपासून अमलबजावणी




**नवी दिल्ली** : दहा लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या हँडबॅग्ज, मनगटी घड्याळ, पादत्राणे आणि स्पोर्ट्सवेअर यांसारख्या लक्झरी वस्तूंवर आता स्त्रोतावर १ टक्के 'टॅक्स कलेक्टेड ॲट सोअर्स (टीसीएस) वसूल केला जाईल.

आयकर विभागाने निश्चित केलेल्या १० लाख रुपयांपेक्षा जास्त विक्रीची किंमत असलेल्या लक्झरी वस्तूंच्या विक्रीवर १ टक्के दराने 'टीसीएस' लागू करण्याबाबत अधिसूचित केले आहे. यासंदर्भातील अमलबजावणी २२ एप्रिल २०२५ पासून करण्यात येणार आहे.

जुलै २०२४ मध्ये सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पाचा भाग म्हणून लक्झरी वस्तूंसाठी 'टीसीएस' तरतूद वित्त कायदा, २०२४ द्वारे सादर करण्यात आली.

टीसीएस गोळा करण्याचे बंधन विक्रेत्यावर अधिसूचित वस्तू जसे की **मनगटाचे घड्याळ, कला वस्तू जसे की पेंटिंग, शिल्पे आणि पुरातन वस्तू, नाणी आणि शिक्के, यॉट, हेलिकॉप्टर, लक्झरी हँडबॅग, सनग्लासेस, पादत्राणे, उच्च श्रेणीचे स्पोर्ट्सवेअर आणि होम थिएटर सिस्टीम आणि शर्यत किंवा पोलोसाठी वापरण्याच्या हेतूने घोडे** आदीं संदर्भात असेल.

नांगिया अँडरसन एलएलपी कर भागीदार संदीप झुनझुनवाला म्हणाले की, ही अधिसूचना उच्च-मूल्याच्या वस्तुंच्या खर्चावर देखरेख वाढवण्याच्या आणि लक्झरी वस्तूंच्या विभागातील ऑडिट मजबूत करण्याच्या सरकारच्या हेतूला कार्यान्वित करते. हे कर कक्षेचा विस्तार आणि अधिक आर्थिक पारदर्शकतेला चालना देण्याचे व्यापक धोरण उद्दिष्ट प्रतिबिंबित करते.

विक्रेत्यांना आता टीसीएस तरतुदींचे वेळेवर पालन सुनिश्चित करणे आवश्यक असेल, तर अधिसूचित लक्झरी वस्तूंच्या खरेदीदारांना खरेदीच्या वेळी वर्धित केवायसी आवश्यकता आणि कागदपत्रे अनुभवता येतील.

झुनझुनवाला पुढे म्हणाले, जरी लक्झरी वस्तू क्षेत्राला काही संक्रमणकालीन आव्हानांना सामोरे जावे लागत असले तरी, या उपायामुळे औपचारिकीकरण आणि सुधारित नियामक निरीक्षणाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

## ब्लड कॅन्सरवरील जेनेरिक औषधासाठी यूएसएफडीएची मंजुरी

**नवी दिल्ली** : अरबिंदो फार्माने बुधवारी सांगितले की त्यांची संपूर्ण मालकी असलेली शाखा Eugia Pharma Specialities Ltd ला यूएसएफडीएकडून विशिष्ट प्रकारच्या अस्थिमज्जा आणि ब्लड कॅन्सरमध्ये दर्शविलेल्या Dasatinib टॅब्लेटच्या जेनेरिक उत्पादन आणि विक्री करण्यासाठी अंतिम मंजुरी मिळाली आहे. हे उत्पादन आर्थिक वर्ष २६ च्या पहिल्या तिमाहीमध्ये लॉन्च होण्याची अपेक्षा आहे.

यूएस फूड अँड ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन (यूएसएफडीए) ची मान्यता २० एमजी, ५० एमजी, ७० एमजी, ८० एमजी, १०० एमजी आणि १४० एमजी क्षमतेच्या Dasatinib टॅब्लेटच्या उत्पादन आणि विपणनासाठी आहे, असे ऑरोबिंदो फार्माच्या ने शेअर बाजाराला दिलेल्या माहितीमध्ये म्हटले आहे.

## आयकर विभागाच्या पोर्टलवर 'ई-पे टॅक्स' सुविधा सुरू

### आता करदात्यांना सहज कर भरता येणार




**नवी दिल्ली** : आयकर विभागाने आपल्या आधार ऑनलाइन पोर्टलवर 'ई-पे टॅक्स' सुविधा सुरू केली आहे. करदात्यांची सोय लक्षात घेऊन हा निर्णय घेतल्याचे विभागाने मंगळवारी सांगितले. आता करदात्यांना त्यांचा कर सहजासहजी भरता येणार आहे.

आयकर विभागाने एका निवेदनात म्हटले आहे की, विभागाने सुरू केलेली 'ई-पे टॅक्स' सुविधा तुमच्या कर दायित्वांची पूर्तता करण्याचा एक सुंदर, कार्यक्षम आणि त्रासमुक्त मार्ग आहे.

आयकर खात्याने पुढे म्हटले आहे की, आता बँकांमधील लांबलचक रांगा, कंटाळवाणे फॉर्म भरणे आणि कर भरण्याच्या शेवटच्या क्षणी चिंता करण्याचे दिवस संपले आहेत. कर भरणे सोपे आणि सोयीस्कर बनवण्यासाठी आणि लोकांना डिजिटली सक्षम बनवण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकण्यासाठी, आयकर विभागाने त्यांच्या अधिकृत ऑनलाइन पोर्टलवर 'ई-पे टॅक्स' सुविधा सुरू केली आहे.

या सुविधेमुळे कर भरण्याच्या प्रक्रियेतील अडथळे दूर होतील, असे आयकर विभागाने म्हटले आहे. वेळेवर कर भरण्याच्या संस्कृतीलाही प्रोत्साहन मिळेल. या सुविधेमुळे कर प्रशासन नागरिकांच्या, विशेषतः व्यक्ती आणि लहान व्यवसायांच्या जवळ येते आणि त्यांना थेट डिजिटल मार्ग उपलब्ध होतो, असे विभागाने पुढे म्हटले आहे.

## थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथी निमित्त सामाजिक कार्यक्रम; शुक्रवारी नियोजन बैठक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

कष्टकऱ्यांचे द्रष्ट नेते थोर समाजसुधारक स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३७ व्या पुण्यतिथी निमित्ताने जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाच्या नियोजन संदर्भातील बैठक शुक्रवार दिनांक २५ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता उलवे नोड येथे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

जनार्दन भगत साहेबांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील कार्य अफाट राहिले आहे. त्यांनी अहोरात्र जनतेची सेवा केली. फक्त राजकारण नाही तर सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. आयुष्यापेक्षा ध्येय्य मोठे असले पाहिजे, ही शिकवण त्यांनी समाजामध्ये रुजवली. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही सामाजिक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने उलवे नोड मधील सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये हि बैठक होणार असून नियोजन समितीमधील पदाधिकारी, सदस्य व कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी केले आहे.

## सेफगार्ड ड्युटीमुळे निवडक देशांमधून पोलाद आयातीचा ओघ थांबेल

### भारतीय स्टील असोसिएशनचा दावा

नवी दिल्ली : आयात स्टील उत्पादनांवर १२ टक्के तात्पुरते संरक्षण आयात शुल्क लावण्याच्या सरकारच्या निर्णयामुळे मुख्यतः चीन, दक्षिण कोरिया आणि जपानमधून स्वस्त आयातीचा ओघ रोखण्यात मदत होईल, असे भारतीय स्टील असोसिएशनने (आयएसए) बुधवारी सांगितले.

उद्योग संस्थेच्या मते, या देशांनी आर्थिक वर्ष २५ मध्ये एकूण आयातीमध्ये सुमारे ७८ टक्के योगदान दिले आहे. या उपायाचा उद्देश प्रामुख्याने चीन, दक्षिण कोरिया आणि जपानमधून स्वस्त स्टील आयातीचा ओघ रोखणे आहे, असे 'आयएसएस'ने एका निवेदनात म्हटले आहे.

'आयएसए'ने पुढे सांगितले की, २०२४-२५ मध्ये आयात ९.५ दशलक्ष मेट्रिक टनांच्या नऊ वर्षांच्या उच्चांकावर पोहोचून, भारत सलग दुसऱ्या वर्षी तयार स्टीलचा निव्वळ आयातदार बनला आहे. डीजीटीआरने डिसेंबर २०२४ मध्ये सुरू केलेल्या तपासानंतर 'ड्युटी' आकारण्याची शिफारस केली आहे. बिगर-मिश्रधातू आणि मिश्र धातुच्या सपाट उत्पादनांच्या आयातीतील तीव्र वाढीमुळे देशांतर्गत उत्पादकांना मोठी हानी होत असल्याचे चौकशीत समोर आले आहे, असे त्यात म्हटले आहे.

सपाट पोलाद उत्पादनांवर १२ टक्के सेफगार्ड ड्युटी लादण्याच्या सरकारच्या निर्णयाबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत, ज्याची आयात रोखण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. आत्मनिर्भर भारतासाठी २०३० पर्यंत ३०० दशलक्ष टनांच्या क्षमतावाढीसाठी गुंतवणूकदारांना नव्या जोमाने लक्ष केंद्रित करण्यास मदत करेल, असे 'आयएसए' नवीन जिंदाल यांनी निवेदनात नमूद केले आहे.

देशांतर्गत कंपन्यांकडून होणारी आयात रोखण्यासाठी सरकारने सोमवारी हॉट रोल्ड कॉइल्स, शीट्स आणि प्लेट्ससह पाच स्टील उत्पादनांच्या श्रेणींवर २०० दिवसांसाठी १२ टक्के तात्पुरते संरक्षण शुल्क लागू केले.

## सेन्सेक्स पुन्हा ८० हजारांवर

- आयटी, वाहन समभागांची खरेदी
- शेअर बाजारात सातव्या दिवशी तेजी
- विदेशी गुंतवणूक संस्थांचा ओघ कायम

**मुंबई** : भारतीय शेअर बाजारांत बुधवारी सातव्या दिवशी तेजी कायम राहिली. आयटी, वाहन समभागांची खरेदी आणि विदेशी गुंतवणूक संस्थांकडून खरेदी सुरु राहिल्याने सेन्सेक्स ५२१ अंकांनी उसळून पुन्हा ८० हजारांवर गेला. परकीय निधीचा ओघ आणि सकारात्मक जागतिक ट्रेंडमुळेही बाजारातील भावना वाढल्याचे विश्लेषकांनी सांगितले.

दरम्यान, भारतीय चलन बाजारात अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया २५ पैशांनी कमजोर होऊन ८५.४४ झाला.

बीएसई सेन्सेक्स ५२०.९० अंकांनी किंवा ०.६५ टक्क्यांनी वाढून ८०,११६.४९ वर बंद झाला, जो १८ डिसेंबरनंतरचा सर्वोच्च बंद स्तर आहे. दिवसभरात तो ६५८.९६ अंकांनी किंवा ०.८२ टक्क्यांनी वाढून ८०,२५४.५५ वर पोहोचला. एनएसई निफ्टी १६१.७० अंकांनी किंवा ०.६७ टक्क्यांनी वाढून २४,३२८.९५ वर पोहोचला.

सेन्सेक्स कंपन्यांमध्ये, एचसीएल टेकने मार्च २०२४-२५ च्या तिमाहीत एकत्रित निव्वळ नफ्यात ८.१ टक्क्यांनी वाढ केल्यानंतर कंपनीचा समभाग ७.७२ टक्क्यांनी वाढला. तर टेक महिंद्रा, टाटा मोटर्स, इन्फोसिस, महिंद्रा अँड महिंद्रा, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, टाटा स्टील, भारती एअरटेल आणि मारुती यांचाही मोठा फायदा झाला. बँकिंग समभागांची विक्री झाली. एचडीएफसी बँकेचा समभाग १.९८ टक्क्यांनी घसरला. त्याचबरोबर कोटक महिंद्रा बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया, अ‍ॅक्सिस बँक, आयटीसी आणि अल्ट्राटेक सिमेंट हेही घसरले.

**सात सत्रात गुंतवणूकदार ३६.६५ लाख कोटींनी श्रीमंत**

शेअर बाजारातील सात सत्रांतील तेजीने गुंतवणूकदारांच्या संपत्तीमध्ये ३६.६५ लाख कोटी रुपयांची भर पडली. सात दिवसात सेन्सेक्स आठ टक्क्यांहून अधिक उसळला. गेल्या सात व्यवहार सत्रांत बीएसई-सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल ३६,६५,५४२.८३ कोटी रुपयांनी वाढून ४,३०,४७,८७६.०५ कोटी (५.०४ ट्रिलियन डॉलर) झाले.



जागतिक तेल बाजारात ब्रेंट क्रूड १.३५ टक्क्यांनी वाढून ६८.३५ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचले. तर विदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी (एफआयआय) मंगळवारी १,२९०.४३ कोटी रुपयांच्या समभागांची खरेदी केली, असे एक्सचेंजच्या आकडेवारीनुसार दिसून येते.

बीएसई मिडकॅप ०.९४ टक्क्यांनी आणि स्मॉलकॅप निर्देशांक ०.२६ टक्क्यांनी वाढला.

बीएसई क्षेत्रीय निर्देशांकांमध्ये, बीएसई फोकस्ड आयटी ४.२५ टक्क्यांनी, आयटीने ४ टक्क्यांनी, टेक ३.१० टक्के, वाहन २.३४ टक्के, रिअ‍ॅल्टी १.३७ टक्के, आरोग्यसेवा ०.९६ टक्के आणि औद्योगिक ०.८ टक्के वाढले. तर वित्तीय सेवा, बँकेक्स आणि कंझ्युमर ड्युरेबल्स हे पिछाडीवर होते. बीएसईवर तब्बल २,०७८ समभाग वाढले तर १,८७३ घसरले आणि १५५ मध्ये बदल झाला नाही. मंगळवारी बीएसई १८७.०९ अंकांनी वाढून ७९,५९५.५९ वर तर निफ्टी ४१.७० अंकांनी वाढून २४,१६७.२५ वर गेला.

## व्याजदर कपातीमुळे अर्थव्यवस्थेला चालना : आरबीआय इतिवृत्त

**मुंबई** : नुकत्याच करण्यात आलेल्या व्याजदर कपातीमुळे खाजगी ग्राहकोपयोगी वस्तुंची विक्री वाढेल आणि खाजगी कॉर्पोरेट गुंतवणुकीला चालना मिळेल, असे मत रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी मांडले होते.

गव्हर्नर मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखालील पतधोरण समितीने (एमपीसी) ९ एप्रिल रोजी अल्पकालीन कर्जदरात २५ आधार अंकांनी घट करून ६ टक्क्यांवर आणली होती. तत्पूर्वी, फेब्रुवारीमध्येही अशीच व्याजदर कपात करण्यात आली होती.

जेव्हा ग्राहक किमतीची चलनवाढ ४ टक्क्यांच्या उद्दिष्टाच्या आसपास असते आणि वाढ अजूनही मध्यम आणि सावरत असते, तेव्हा आर्थिक धोरणवाढीचा वेग आणखी वाढवण्यासाठी देशांतर्गत मागणी वाढवणे आवश्यक आहे. हे विशेषतः अनिश्चित जागतिक वातावरणात करणे गरजेचे आहे, असे आरबीआयने बुधवारी जारी केलेल्या एमपीसी बैठकीच्या इतिवृत्तात म्हटले आहे.

## चल गं सई

आज मला
खेळायचं
नाही गं बाई ॥धृ॥

चल गं सई
रुसवा नको
सोबत खेळू
चोर शिपाई !
रागावू नको
घाबरू नको
पळण्याची शर्यत
नकोच नको !!१!!

चल गं सई
लाजू नको
खेळ नवा
शोधला असो !
पाण्यातला खेळ
अजिबात नाही
झाडावर खेळू
हो ना बाई !!२!!

चल गं सई
रडू नको
आपण खेळू
झिम्मा बाई !
उडी मारू
लपाछपी खेळू
शेवटी करू
पळापळी बाई !!३!!

चल गं सई
खेळ ना बाई
मोठी संधी
दवडू नको !
माई येईल
ताई येईल
नवं- नवीन
खेळ सांगेल
नावे ऐकून
हसू नको !!४!!

**प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर**
**छ. संभाजीनगर**

## चि.स्वयंम दशरथ इंगोले याने मिळवला राज्यात 21 वा क्रमांक

दैनिक युवक आधार
सणसर :- विकास क्षत्रिय

मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षा 2024-25 मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पवारवाडी केंद्र सणसर तालुका इंदापूर जिल्हा पुणे येथील इयत्ता दुसरी मधील तीन पैकी तीनही विद्यार्थ्यांनी पहिल्याच प्रयत्नात नेत्र दीपक यश संपादन केले आहे.स्वयम दशरथ इंगोले या विद्यार्थ्याने 150 पैकी 110 गुण मिळवत राज्यात एकविसावा जिल्ह्यात सोळावा व कुरवली केंद्रामध्ये तिसरा क्रमांक पटकावला आहे. तसेच अनुज माधव कुदळे यांने 100 शाळेत दुसरा तर ईशल नंदकुमार कन्हेरकर या विद्यार्थीनीने 92 गुण मिळवत शाळेत तिसरा क्रमांक मिळविला आहे.सर्व विद्यार्थ्यांना श्री देवआनंद जमदाडे सर यांनी मार्गदर्शन केले.मुख्याध्यापिका सौ वंदना भोईटे मॅडम,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री सुशांत पवार व सर्व सदस्य, तसेच सामाजिक कार्यकर्ते प्रहार दिव्यांग संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष श्री सुभाष इंगोले यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन जिल्हा परिषद शाळा पवारवाडी साठी लागेल ती मदत करणार असल्याची घोषणा करण्यात आली.

## चोळवा : छोटीशी व ठळकपणे स्पष्ट दिसणारी पायवाट

माळरानावर माणसांच्या सततच्या वावरण्याने पावलांनी निर्माण झालेली छोटीशी व ठळक स्पष्ट दिसणारी पायवाट म्हणजे ' चोळवा ' होय. आदिवासींची गावं ही डोंगराळ भागात, दरी खोऱ्यात,सपाट असलेल्या माळरानावर तसेच निसर्गाच्या कुशीत वसलेले असल्याने पूर्वीपासून उन्हाळा, पावसाळा व हिवाळा या तीनही ऋतूत शेतकरी, कष्टकरी व मजूरदार वर्ग आपल्या शेतातील कामे करण्यासाठी किंवा वाहतूक करण्यासाठी जंगलातील असलेल्या पायवाटेनेच करावी लागते. ही वाट डोंगर दऱ्यात, चढ उतार, सपाट माळरानावर जात असते. या पायवाटेने जात असताना दोन्ही बाजूंनी डोलणारी हिरवीगार पिकं ही वाटेने जाणाऱ्या माणसांना रानोमाळ आनंदित करीत असतात. तसेच असलेल्या पायवाटेला सुनाट वेळेस रानातली पाखरे, इतर पक्षी,लहान लहान दिसणाऱ्या मुंग्या ह्या येता जाता शेतकऱ्यांनी डोक्यावरून वाहून नेलेल्या पिकातील पडलेले धान्य, दाणे तोंडात धरून नेत असतांना दिसतात. कधी कधी एखादा धामण साप अचानक वाटेवरून सरपटत गवतात जातांना आढळतो. ज्या सापाची धुळीत जास्त प्रमाणात वेडीवाकडी वळणे उमटलेली असतील तो साप विषारी आहे व ज्या सापाची जास्त प्रमाणात वळणे सरळ आहेत तो बिनविषारी आहे हे त्या पायवाटेवर उमटलेल्या वळणावरूनच आदिवासी बांधव ओळखून घेतात.मोठ्या गवतात, लहान मोठ्या झुडुपात मनसोक्त विहार करणारी पाखरं माणसांच्या पावलांच्या आवाजाने भुर्रकन उडून जातांना दिसत असतात. रात्रीच्या वेळी जंगलातील हिंस्त्र प्राणी वाघ, बिबट्या तसेच मुंगूस अशा प्राण्यांच्या पावलांचे ठसे सकाळी गुरे घेऊन जाणाऱ्या गुराख्याना वाटेवर उमटलेले दिसतात. नदीकाठावरून गेले असता हिवाळ्यात संथपणे पाण्यात पोहणारी माश्यांची दोरणच दिसत असते. दोन्ही बाजूला शेतबांधावर वनराई व शेतपिकाला लागूनच दाट झाडी झुडुपातून चढ उतारावरून नदीच्या काठावरून नागमोडी वळणे घेणारी पायवाट ही जनावरे व माणसांच्या नेहमी लक्षात राहत असे. लांबच्या पायी प्रवासात चालून दमलेला वाटसरू बाजूला असलेल्या एखाद्या विस्तीर्ण मोठ्या झाडाच्या सावलीत विश्रांतीसाठी बसत असे. त्यावेळी माळवाटेला लागूनच असलेल्या पिकांपैकी तूर,चवळीच्या शेंगा, हरभरा कुणाच्या शेतात दिसले की,लगेच वाटसरू आवडीने तोडून खात असे किंवा एखादा ओळखीचा माणूस भेटला तर शेतातील गावरान हिरव्या मिरच्या, भेंडी, गवारीच्या शेंगा, वाळका हे सर्व वानोळा म्हणून देत असतात. तसेच रानवाटा जरी लक्षात राहत असली तरी अनेक ठिकाणी शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांना आपुलकीने विचारावे लागत असते. की, ही वाट कुठे जाते हे विचारावे लागते. त्यावेळी आदिवासी या डोंगराळ भागात वाहतुकीचे साधन म्हणजे फक्त खेडोपाड्यात बैलगाडी होती. तीही ठराविक लोकांकडे असे. डोंगर उतारावर, माळरानावर येताना याच वाटेला अनेकांची पावले उमटलेली दिसतात.गावातील कोणतेही कार्यक्रम हे शकतो संध्याकाळी होत असतात. तसेच आजारी व्यक्ती दवाखान्यात, विद्यार्थी शिक्षणासाठी, बाहेरगावी, बाजारात जाण्यासाठी याच माळरानातील पायवाटेने पायपीट करावी लागत असते. आता खेडोपाड्यात डांबरी रस्ते झाल्याने प्रत्येकाजवळ दुचाकी, चारचाकी व ट्रॅक्टर अशा प्रकारची साधने आल्याने शेतीची कामे ही सोपी झाल्यामुळे पायपीट कमी झाल्याचे आपणांस दिसत आहे. आदिवासी बांधव रोजगारासाठी, नोकरीच्या शोधात शहराकडे मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित होत असल्याने रानातील या पायवाटांचफारसा संबंध येत नाही. त्यामुळे या पायवाटा आता हळूहळू नामशेष होत आहेत.

**राजेंद्र टोपले, वांगण सुळे ,सुरगाणा**
**दैनिक युवक आधार प्रतिनिधी**

## पनवेल तालुक्यातील तोंडरे गावातील एक शेतकरी २९ वर्ष लढतोय स्वतःच्या जमिनीचा लढा...

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर - किशोर पगारे**



पनवेल तालुक्यातील तोंडरे गावात एम आयडीसी आल्यानंतर अनेक शेतकरी कुटुंबाच्या जमिनी महाराष्ट्र औद्योगिक महामंडळातर्फे विकत घेउन त्यांना मोबदला देण्यात आला पण तोंडरे गावातील जनार्धन कुंडलिक पाटील हे शेतकरी व्यक्ती ह्या लाभापासून वंचित राहिलेत ते 29 वर्षे आपल्या हक्काची लढाई लढत आहे यांच्या मालकीची जमीन होती या जमिनीवर बेकायदेशीरपणे हायकल केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेड ह्या कपंनीने अतिक्रमण करून जमीन ताब्यात घेऊन त्यांची तेरा सागाची झाडे व सहा आंब्याचे झाड तोडले आहे मागील दोन टर्म चे उद्योग मंत्री, पोलीस स्थानक, पनवेल हायकोर्ट, कोर्टात सुद्धा लढा लढलेला आहे परंतु कोर्टाने निकाल दिल्यानंतर सुद्धा त्यांची जमीन त्यांच्या ताब्यात मिळालेली नाही या व्यक्तीच्या हाती काही लागले नाही अगदी त्यांनी आझाद मैदान येथे सुद्धा उपोषण केलं त्यामुळे स्वतःची जमीन असून हायकल केमिकल कंपनी यांनी जी त्यांची जागा हडपली आहे याकरता त्यांनी दिवाणी कोर्टात न्याय सुद्धा मागितला आहे याबद्दल त्यांचे प्रयत्न सुरू आहेत आजही ते सरकारी दरबारी खेटा घालत आहेत. न्यायची ते प्रतीक्षा करत आहेत.

## मा.श्री.खा संजय उत्तमराव देशमुख यवतमाळ - वाशिम लोकसभा यांच्या भव्यदिव्य वाढदिवसानिमित्त अपंग बंधू-भगिनीसाठी मोफत साधने शिबिर.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार.**



शिबिर मधे तपासणी खालील प्रकार च्या दिव्यांग व्यक्ती साठी असेल. दिव्यांग प्रकार आणि साहित्य आणि अपंग टक्केवारी खालील प्रमाणे १ .अस्थी व्यंग - तीन चाकी सायकल , व्हील चेअर , काठी , कुबडी, सी. पी. चेअर किमान ४०% आणि वर दिव्यांग प्रमाणपत् टिप- बैटरी ऑपरेटेड तीन चाकी सायकल साठी किमान ८०% दिव्यांग प्रमाण पत्र आवश्यक ( बहिरा , अंध, मतिमंद नसावा आणि दोन्ही हाथ सुस्थितीत असावे ) अंध प्रवर्ग ( १००% ) - प्राथमिक आणि माध्यमिक विद्यार्थी साठी ब्रेल किट , अंध काठी .
इयत्ता १० पासून पुढे शिकत असल्यास स्मार्ट. फोन आणि सुगम्य केन ( सेन्सर अंध काठी) शाळेत शिकत असल्याचा पुरावा शाळेचे / कॉलेज चे ओळखपत्र किंवा बॉनफाईड आवश्यक.
कर्णबधिर - कानाची मशीन हाथ व पाय नसल्यास कृत्रिम अवयव चे मोजमाप घेऊन नंतर कृत्रिम अवयव बसविण्यात येतील
आवश्यक कागदपत्र ( झेरॉक्स) १. UDID कार्ड ( आवश्यक) आणि दिव्यांग प्रमाणपत्र २. आधार कार्ड ३. उत्पन्न दाखला / रेशन कार्ड उत्पन्न दर्शविणारे ( मासिक -२२५००/- रू. किंवा वार्षिक २७००००/- रू. च्या आत ) सूचना - वरील ३ कागदपत्र असल्यावरच तपासणी करण्यात येईल
शिबिर मधे राष्ट्रीय व्योश्री अंतर्गत तपासणी ज्येष्ठ नागरिक साठी असेल (60 वर्ष व 60 वर्षा वरिल). आवश्यक कागदपत्र ( झेरॉक्स) १. आधार कार्ड २. उत्पन्न दाखला / रेशन कार्ड उत्पन्न दर्शविणारे ( मासिक -१५०००/- रू. किंवा वार्षिक १८००००/- रू. च्या आत) सूचना - वरील २ कागदपत्रे असल्यावरच तपासणी करण्यात येईल.असे आवाहन. मंगरूळपिर तालुका प्रमुख. रामदास सुर्वे पाटील यांनी केले आहे.